रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २५८
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, ६ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## लालू प्रसाद यादव यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी



**ग्वाल्हेर :** बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांच्याविरोधात ग्वाल्हेर येथील पीएमएलए न्यायालयाने १९९५ आणि १९९७च्या आर्म्स ॲक्टप्रकरणी अटक वॉरंट जारी केले आहे. या प्रकरणात लालू प्रसाद यादव यांच्या नावाने शस्त्रे खरेदी करण्यात आली होती आणि ती शस्त्रे वेगवेगळ्या ठिकाणी पुरवण्यात आली होती. तपासानुसार हे प्रकरण ऑगस्ट १९९५ ते मे १९९७ दरम्यान घडले. या कालावधीत तीन वेगवेगळ्या कंपन्यांकडून काडतुसे खरेदी करण्यात आली होती. या प्रकरणी २३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. लालू प्रसाद यादव यांना हजर राहण्याची न्यायालयाची नोटीस असूनही ते हजर न झाल्याने त्यांच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या अटकेची शक्यता आहे.

# जागावाटपावरून ‘मविआ’त सुंदोपसुंदी

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राज्यात महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा आणखी गुंतागुंतीचा होत चालला आहे. सांगली, भिवंडी आणि मुंबईतील जागेवरून काँग्रेस, शरद पवार गट आणि ठाकरे गटाचे बिनसले आहे. चर्चेतूनही यावर मार्ग निघत नसल्याचे दिसून येत असून आता इशारा, प्रत्युत्तराची भाषा होऊ लागली आहे.



सांगलीच्या जागेवरून गल्ली ते दिल्ली वाद सुरूच आहे. सांगलीची जागा काँग्रेसला हवी अशी मागणी कार्यकर्त्यांची आहे. काँग्रेस नेतेही त्यासाठी आग्रही आहेत, मात्र या जागेवर उद्धव ठाकरेंनी पैलवान चंद्रहार पाटील यांची परस्पर उमेदवारी जाहीर केल्याने काँग्रेसमध्ये नाराजी पसरली आहे. अशातच उबाठा गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी, राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रीय पातळीवरील राजकारण करावे. आला तर तुमच्याबरोबर नाही तर तुमच्याशिवाय निवडणूक लढवली जाईल. हिंदकेसरीने गल्लीतली कुस्ती खेळू नये. तुम्ही राष्ट्रीय पक्ष आहात, त्या उंचीवर राहा. सांगलीतील आम्ही बघून घेऊ, असा इशारा काँग्रेसला दिला आहे. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आघाडी धर्म पाळला नाही तर रोष निर्माण होतो, असे सूचक वक्तव्य केले आहे.

दरम्यान, खासदार संजय राऊत सांगलीमध्ये पोहचताच ही जागा काँग्रेसला सुटत नसल्याने कमालीचे नाराज झालेले आमदार विश्वजीत कदम आणि विशाल पाटील तातडीने खासगी विमानाने दिल्लीला रवाना झाले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत यांनी सांगलीच्या जागेचा निर्णय दिल्ली दरबारी होणार असून त्यानंतर आम्ही आमची भूमिका घेऊ, असे म्हटले आहे.

अशाच प्रकारे भिवंडीच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही होती. तिथे शरद पवार गटाने सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे नाराज काँग्रेस नेत्यांकडून आता दिल्लीकडे सध्याच्या राजकीय परिस्थितीचा अहवाल पाठवला आहे.

मुंबईतील दक्षिण मध्य मुंबई या जागेवरदेखील काँग्रेसने लढण्याची तयारी केली होती. इथे मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची तयारी होती, परंतु या जागेवर उद्धव ठाकरेंनी अनिल देसाईंची उमेदवारी जाहीर केली. मुंबईतील सहापैकी चार जागांवर ठाकरेंनी उमेदवार जाहीर केलेत. त्यात उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई या जागेवर अद्यापही उमेदवार घोषित केले गेले नाहीत, पण जर मित्रपक्षाला या जागा लढायच्या नसतील तर तिथेही आम्ही उमेदवार घोषित करू, असे ठाकरेंनी म्हटले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत काँग्रेसची कोंडी होतेय का असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर काँग्रेस नेमकी काय भूमिका घेते याकडे लक्ष लागले आहे.

## काँग्रेसच्या जाहीरनाम्यात विदेशातील फोटो

### भाजपकडून पोलखोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेसच्या मुख्यालयात शुक्रवारी (दि.५) पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्यात वारेमाप घोषणा करण्यात आल्या आहेत. भाजपकडून काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका करण्यात आली आहे. या जाहीरनाम्यात अमेरिका आणि थायलंड देशातील फोटो छापण्यात आले आहेत. यावरून काँग्रेस किती गंभीर आहे हे दिसून येते, असा टोला भाजपचे नेते सुधांशू त्रिवेदी यांनी लगावला आहे.

भाजप नेते सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसचा समाचार घेतला. ते म्हणाले, मध्यंतरी काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रमुख म्हटल्या होते की, त्यांचे सोशल मीडिया कोण हाताळते? हे त्यांना माहीत नाही, पण पक्षाचा जाहीरनामा कोण तयार करते हे तरी पक्षाला माहीत असावे ना. जाहीरनाम्यात पर्यावरण विभागात जे फोटो छापले गेले आहेत, ते राहुल गांधींच्या आवडत्या थायलंड देशाचे आहेत.



त्रिवेदी पुढे म्हणाले की, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात चुकीचे फोटो वापरले गेले हा मोठा विषय नाही, पण ते फोटो विदेशातील आहेत हा चिंतेचा विषय आहे. आतापर्यंत काँग्रेस नेते विदेशात जाऊन भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बदनामी करीत होते, पण आता तर ते विदेशातील फोटो आणि त्यांचा जाहीरनामाच उचलत आहेत.

काँग्रेसने त्यांच्या जाहीरनाम्यात जी आश्वासने दिली आहेत, ती त्यांनी स्वतःच्या शासन काळात कधीच पूर्ण केलेली नाहीत. मग त्यांचे सरकार केंद्रात असो किंवा कोणत्याही राज्यात असो, अशीही टीकाही त्रिवेदी यांनी केली आहे.

## खासदार डॉ. सुजय विखे-पाटील उद्या कामोठ्यात

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महायुतीचे नगर दक्षिणचे उमेदवार डॉ.सुजय विखे-पाटील यांना बहुमताने विजयी करण्यासाठी पनवेलचे भाजप आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि.७) सायंकाळी ५ वाजता कामोठ्यातील नालंदा बुद्ध विहार मैदानावर पनवेल, नवी मुंबई आणि मुंबईस्थित पारनेरकरवासीयांचा परिवार संवाद भव्य मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रमुख निमंत्रक विजय औटी यांनी दिली.



लोकसभा निवडणुकीसाठी नगर दक्षिण मतदारसंघात महायुतीकडून विद्यमान खासदार डॉ.सुजय विखे-पाटील पुन्हा एकदा मैदानात आहेत, तर महाविकास आघाडीकडून माजी आमदार निलेश लंके उमेदवार आहेत. खासदार विखे हे आपण पाच वर्षांत केलेली कामे, मोदी सरकारची १० वर्षांतील देश उभारणीसाठी झालेली पायाभरणी, आधुनिकतेकडे वाटचाल या मुद्द्यांवर मते मागत आहेत. दुसरीकडे नवी मुंबईतील पारनेरवासीयांच्या एकजुटीचा तत्कालीन आमदार निलेश लंके यांनी राजकारणात शिताफीने वापर केला, मात्र निवडून आल्यानंतर पारनेरकर परिवाराची वेळोवेळी मानहानी केली. त्यांच्या दुखावलेल्या भावना, आमदारकीचा नवी मुंबई, मुंबईस्थित पारनेरकर परिवाराला झालेला शून्य फायदा, आमदार झाल्यानंतर बदललेले रंग यामुळे सर्व पारनेरकर नाराज आहेत. त्या अनुषंगाने या परिवार मेळाव्याचे आयोजन केले असल्याचे विजुभाऊ औटी मित्र परिवाराने म्हटले आहे.

परिवार संवाद मेळावा यशस्वी करण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्ष तसेच विजुभाऊ औटी मित्र परिवार, कामोठे रहिवासी सांस्कृतिक युवा मित्र मंडळ, संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन, सर्व पारनेरकर कार्यरत आहेत.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची भेट



**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**


राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि.५) रेवदंडा येथे ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री, महाराष्ट्रभूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. धर्माधिकारी कुटुंबीयांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे उपस्थित होते. या वेळी निरूपणकार रायगडभूषण सचिनदादा धर्माधिकारी, राहुलदादा धर्माधिकारी यांच्यासह कुटुंबीय हजर होते.

डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची आज सदिच्छा भेट होती, असे सांगून महायुतीमधील जागावाटप लवकरच पूर्ण होईल. सर्वकाही व्यवस्थित होईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सांगितले.

## निवडक

### दहशतवाद्यांना पाकिस्तानात घुसून मारू -संरक्षणमंत्री राजनाथ सिंह



**नवी दिल्ली :** भारतात दहशतवादी कारवाया करून कोणी पाकिस्तानात पळून गेला तर आम्ही त्याला तिथे घुसून मारू, असे केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे. ‘नेटवर्क १८’ला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. शेजारच्या देशातून आपल्या देशात दहशतवादी कारवाया होत असतील आणि आपल्या देशाची शांतता भंग करण्याचा प्रयत्न होत असेल, तर आम्ही त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देऊ, असे संरक्षणमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.

### ‘पेटा’कडून आमदार रोहित पवार यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**मुंबई :** आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर घोटाळ्याचा आरोप करताना भर पत्रकार परिषदेत जिवंत खेकडा दाखवल्याने खासदार शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार अडचणीत आले आहेत. खेकड्याचा छळ केल्याप्रकरणी रोहित पवारांवर कारवाई करावी, अशी मागणी पेटा या प्राणीप्रेमी संघटनेने केली आहे. ‘पेटा’ने निवडणूक आयोगाला तसेच पक्षाध्यक्षांना पत्र पाठवून तक्रार केली आहे.

## उबाठाच्या उपशाखाप्रमुख, गटप्रमुखांचा भाजपमध्ये प्रवेश



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडल्याने सामान्य कार्यकर्त्यांची घुसमट होत असल्याने हे कार्यकर्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत, असे मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी शुक्रवारी (दि.५) येथे म्हटले.

चेंबूर व गोवंडी विधानसभा मतदारसंघातील उबाठा पक्षाच्या उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, कार्यालयप्रमुख अशा २००हून अधिक जणांनी सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, भाजप मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. त्या वेळी आमदार शेलार पत्रकारांशी बोलत होते.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेश शिरवाडकर, जगदीश पराडकर, महादेव शिगवण, नीरज उभारे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उबाठाचे कार्यालय प्रमुख राजेंद्र भोईर, उपशाखाप्रमुख आनंद नलावडे, संतोष मिटकर, संजय वैती, प्रफुल्ल ठाकूर, रमेश उगले, गटप्रमुख राजेंद्र पवार, संजीव वर्तक, विठ्ठल जाधव, उपशाखाप्रमुख जगदीश पंडित, अर्चना गावंड, अंजली पाटील आदींनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

## मुत्तेमवारांविरोधात भाजपची तक्रार

**नागपूर : प्रतिनिधी**

काँग्रेसचे माजी खासदार विलास मुत्तेमवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आक्षेपार्ह टीका केली. त्यांच्या वडिलांवरून अत्यंत खालच्या स्तराच्या भाषेचा वापर केला. त्यामुळे निवडणूक आयोगाने विलास मुत्तेमवार यांच्यावर कारवाई करावी, असे निवेदन भाजपकडून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विलास मुत्तेमवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीन गडकरी यांच्यावर अश्लाघ्य टीका केली. यावरून भाजपचे नेते आक्रमक झाले असून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि.५) नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन मुत्तेमवार यांच्यावर कारवाई करावी, असे निवेदन दिले. आम्हाला अपेक्षा आहे, की निवडणूक आयोग कारवाई करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## प्रचारादरम्यान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी पातळी ओलांडली

### उपचार घेत असलेल्या खासदाराबाबत वादग्रस्त विधान; भाजपकडून संताप

**मुंबई : प्रतिनिधी**

अकोल्याचे विद्यमान खासदार संजय धोत्रे यांची प्रकृती सध्या बरी नसून ते रुग्णालयात उपचार घेत आहेत. धोत्रे सध्या व्हेंटिलेटरवर आहेत. दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अकोल्यातील प्रचारसभेत बोलताना खासदार धोत्रेंबाबत वादग्रस्त व्यक्तव्य केले. या वक्तव्यामुळे पटोलेंवर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पटोले यांनी माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

अकोला लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले गुरुवारी (दि.४) अकोल्यात आले होते. या वेळी स्वराज्य भवन येथे आयोजित



प्रचारसभेत नाना पटोले म्हणाले की, खासदार संजय धोत्रे सध्या व्हेंटिलेटरवर आहेत. त्यांचे व्हेंटिलेटर केव्हा काढतील मला माहिती नाही, पण ते निवडणुकीतच काढतील. पटोले यांनी सारवासारव करत संजय धोत्रे त्यांचे मित्र असल्याचे सांगितले, मात्र पटोले यांच्या वक्तव्यावरून वाद पेटला आहे.

पटोले यांच्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करीत नाराजी जाहीर केली आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, काँग्रेस पक्ष एकीकडे दिल्लीत ‘न्यायपत्र’ (निवडणुकीचा जाहीरनामा) जाहीर करतो आणि दुसरीकडे त्यांचे राज्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले भर सभेत एका खासदाराच्या ‘मृत्यूची कामना’ करतात? हा असंवेदनशीलतेचा कहर आहे. निवडणुकीत आपण विरोधक असलो तरी विरोधकांच्या मृत्यूची कामना ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. महाराष्ट्र आणि अकोल्यातील जनतेची तत्काळ माफी मागा! खासदार संजय धोत्रे यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

## कल्याणच्या महिलेने पंतप्रधान मोदींना पाठवली पर्यावरणपूरक गुढी

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ घराण्यातील एका महिलेने आपल्या गुढी तयार करण्याच्या व्यवसायातील एक पर्यावरणपूरक देखणी गुढी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नवी दिल्ली येथील त्यांच्या घरी चैत्र पाडव्याच्या दिवशी उभारण्यासाठी पाठविली आहे. अयोध्येत राम मंदिराची उभारणी आणि संस्कृती संवर्धनासाठी पंतप्रधान मोदींकडून सुरू असलेल्या प्रयत्नांतून आपण आदरभावाने ही गुढी पंतप्रधानांना खासगी टपालाने पाठविली आहे, अशी माहिती या गुढी व्यवसायातील मुख्य प्रवर्तक मेधा मोहन



आघारकर यांनी दिली.

सध्याच्या धकाधकीत, नोकरी-व्यवसायाच्या व्यापात अनेकांना चैत्र पाडव्याच्या दिवशी घराच्या दारासमोर बांबू आणून गुढी उभारणे शक्य होत नाही. नव्या पिढीला गुढी उभारण्याचे महत्त्व व त्यामधून होणारे आपल्या संस्कृती रक्षणाचे कार्य याविषयी माहिती मिळावी यासाठी मेधा आघारकर पंधरा वर्षांपासून कागद, कपड्याच्या पर्यावरणपूरक गुढ्या बनवित आहेत. सुरुवातीला दोन ते तीन महिलांच्या साहाय्याने तयार करण्यात येणाऱ्या या गुढी तयार करण्यासाठी मेधा यांच्याकडे आता १५ महिला काम करतात. केवळ व्यापारी उद्देशातून या गुढ्या आपण तयार करीत नाहीत तर, आपल्या संस्कृतीची परंपरा पुढे जावी या दूरगामी विचारातून आपण या गुढ्या तयार करीत आहोत, असे आघारकर यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींव्यतिरिक्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व अन्य मान्यवरांना आपण पर्यावरणपूरक गुढ्या पाठविल्या आहेत, असे आघारकर यांनी सांगितले.

## बारामतीची लढत पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी -उपमुख्यमंत्री फडणवीस



**इंदापूर : प्रतिनिधी**

बारामती लोकसभा निवडणूक शरद पवार विरुद्ध अजित पवार किंवा सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात राहुल गांधी अशी आहे. त्यामुळे बारामतीचा खासदार नरेंद्र मोदी यांच्या विकासयात्रेमध्ये चालेल की राहुल गांधी यांच्या समाजविरोधी व देशाच्या विकासाचा अजेंडा नेस्तनाबूत झाला पाहिजे अशा मानसिकतेच्या मागे चालेल याचा फैसला या निवडणुकीच्या माध्यमातून होणार आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.५) भाजपच्या मेळाव्यात म्हटले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंदापूरात माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्या आई कै. गीताबाई त्र्यंबक देशमुख यांचे पाचवे पुण्यस्मरण शुक्रवारी होते. त्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गव्हाण येथे देशमुख यांच्या निवासस्थानी जाऊन कै. गीताबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, कोळी समाजाचे विश्वनाथ कोळी, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख उपस्थित होते.**

# महाविकास आघाडीमुळेच वीज दरवाढ

## भाजप प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना महावितरणवर मोठा आर्थिक बोजा आल्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार राज्यात वीज दरवाढ लागू झाली. महावितरणचा वाढीव खर्च आणि त्यामुळे झालेली वीजदरवाढ याला सर्वस्वी महाविकास आघाडीचे सरकार जबाबदार असून सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वात आघाडीच्या नेत्यांनी आता वीज दरवाढीच्या विरोधात आंदोलन करणे आश्चर्यकारक आहे, अशी टीका भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी केली.

विश्वास पाठक म्हणाले की, महाविकास आघाडीच्या चुकीच्या धोरणांमुळे व हस्तक्षेपामुळे महावितरणला अडीच वर्षांत मोठा आर्थिक बोजा सोसावा लागला. परिणामी ३१ मार्च २०२२ पर्यंतच्या वाढीव आर्थिक बोजामुळे मध्यावधी दरवाढीसाठी राज्य विद्युत नियामक आयोगासमोर सुनावणी झाली व ३१ मार्च २०२३नंतर दरवाढ लागू झाली. महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या कालावधीतील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांमुळे महावितरणवर बोजा आला व त्याची किंमत वीज ग्राहकांना मोजावी लागली.

त्यांनी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील गैरव्यवहारामुळे वीज दरवाढ अपरिहार्य असल्याचे ध्यानात आल्यावर महायुतीच्या सरकारने वीज ग्राहकांवर कमीत कमी बोजा असावा यासाठी प्रयत्न केले. परिणामी वीज ग्राहकांच्या मासिक बिलात चार ते पाच टक्के इतकीच वाढ लागू झालेली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात महावितरणवर आर्थिक बोजा आला नसता तर वीज ग्राहकांवर मध्यावधी वाढ लागू झाली नसती, हे सुप्रिया सुळे व अन्य नेत्यांनी ध्यानात घेण्याची गरज आहे.

सुप्रिया सुळे यांना आंदोलन कराचेच असेल तर त्यांनी ते तत्कालीन ऊर्जा मंत्री यांच्याविरोधात आणि महाविकास आघाडी चालविणाऱ्या शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या विरोधात करावे, असा टोला पाठक यांनी लगावला.


विद्युत नियामक आयोगाचा आदेश गेल्या वर्षी आला होता व त्याचा पहिला टप्पा गेल्या वर्षी १ एप्रिलला लागू झाला होता. आता निवडणुकीमुळे सुप्रिया सुळे हा विषय पुढे आणत असल्या तरी तो त्यांच्यावरच बूमरँग होईल, असेही ते म्हणाले.

ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात महावितरण व महानिर्मितीचे नियोजन पूर्णपणे चुकले होते. त्यामुळे राज्यात लोडशेडिंगला पुन्हा सुरुवात झाली होती. लोडशेडिंगचे कारण सांगून खासगी पुरवठादारांकडून खूप जास्त दराने वीज खरेदी करण्यात आली. यामुळे आलेल्या आर्थिक बोजाची किंमत आज वीजग्राहकांना मोजावी लागत आहे.

# पोलादपुरात वटवृक्षाला आग

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर मार्गावरील मोरगिरी फाट्याजवळील एका जुन्या वटवृक्षाला गुरुवारी (दि. ४) सायंकाळी आग लागली. ही आग विझविण्यासाठी तब्बल दोन ठिकाणचे अग्निशमन बंब बोलावण्यात आले.

पोलादपूर तालुक्यामध्ये महिन्यामधून दोन-चार वणव्यामुळे गुरांच्या गोठयाला अथवा लोकवस्तीतील घरांना आग लागण्याच्या घटना घडत असल्याचे उन्हाळयाच्या ऋतूमध्ये दिसून आले आहे. गुरूवारी पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील पिकनीक स्पॉट या जागतिक दर्जाचे चित्रकार प्रमोद अनंत दिक्षित यांच्या फार्महाऊसबाहेरील एक जुनाट वडाचे झाड सायंकाळी साडेचार वाजल्यानंतर पेटत असल्याचे दिसल्याने महाड एमआयडीसीच्या अग्निशमन यंत्रणेला फोन केला असता, एक अग्निशमन बंब तातडीने आग विझवून गेला, मात्र रात्री पुन्हा या वडाच्या झाडामध्ये आग भडकली आणि महाड नगर परिषदेचा अग्निशमन बंब घटनास्थळी येऊन पाण्याचा मारा करीत पहाटेपर्यंत दुसऱ्यांदा आग विझवून गेला.

पहाटेपर्यंत हा वटवृक्ष आतून जळतच राहिल्याने सकाळी ११ वाजता प्रमोद दिक्षित यांनी मोरगिरी ग्रामपंचायत सरपंच, तहसीलदार, बांधकाम उपविभाग आणि पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये रितसर अर्ज देऊन हे झाड कोसळल्यास रस्ता वाहतुकीस बंद होऊन वाहतुकीची कोंडी होऊ शकते तसेच झाड अथवा झाडाची फांदी वाहनावर कोसळल्यास जीवितहानी होऊ शकते, अशी शक्यता लेखी अर्जातून वर्तवित तातडीने संभाव्य धोका दूर करण्याची मागणी केली आहे.

# निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाईचा बडगा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई उपनगर जिल्हांतर्गत लोकसभा निवडणूक २०२४साठी जे नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर राहिले आहेत, त्यांच्याविरुद्ध लोकप्रतिधीत्व अधिनियम १९५१अंतर्गत फौजदारी कारवाईचा बडगा उचलण्यात येणार असल्याची माहिती मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली.

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत लोकसभा निवडणूक २०२४साठी ५० हजार अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवडणूकविषयक विविध प्रकारच्या कामकाजासंदर्भातील पाच प्रशिक्षण कार्यक्रम झाले आहेत.

या सर्व प्रशिक्षणांना संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य असून गैरहजर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकप्रतिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत दंडात्मक फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली.

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत लोकसभा निवडणूक २०२४साठी सर्व नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी यांनी नियोजित निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास हजर राहणे अनिवार्य असून यासंदर्भातील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यावी, असे आदेश निवडणूक शाखेमार्फत निर्गमित करण्यात आले आहेत.

# नवी मुंबई मेट्रोच्या सेवा वेळेत वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मेट्रो मार्ग १ बेलापूर ते पेंधरदरम्यान धावणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेमध्ये सोमवार (दि.८)पासून वाढ करण्याचा निर्णय सिडको महामंडळातर्फे घेण्यात आला आहे. त्यानुसार बेलापूर मेट्रो स्थानक येथून सुटणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेत एक तासाची तर पेंधर येथून सुटणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेत अर्ध्या तासाची वाढ करण्यात येणार आहे.

आठवड्यातील सर्व दिवशी वाढीव सेवा वेळेनुसार मेट्रो धावणार आहे. नवी मुंबई मेट्रो मार्ग १ बेलापूर ते पेंधरवर धावणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेमध्ये वाढ करण्यात आल्यानंतर बेलापूर मेट्रो स्थानक येथून सकाळी ६वाजता पहिली मेट्रो पेंधरच्या दिशेने व पेंधर येथून बेलापूरच्या दिशेने रवाना होईल. बेलापूर मेट्रो स्थानक येथून शेवटची मेट्रो रात्री ११ वाजता पेंधरच्या दिशेने रवाना होईल तर पेंधर मेट्रो स्थानक येथून शेवटची मेट्रो रात्री १०.३० वाजता बेलापूरच्या दिशेने रवाना होईल. मेट्रोच्या संबंधित प्रवाशांनी याची कृपया नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल मनपातर्फे मतदान जनजागृतीसाठी विविध स्पर्धा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मावळ मतदारसंघामध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी याकूब बेग हायस्कूल पनवेल व जिल्हा परिषद शाळा तुर्भे यांच्या वतीने शुक्रवारी (दि.५) चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या, तसेच मनपा शाळा क्र. ८च्या वतीने मतदानावर आधारित घोषवाक्य स्पर्धा व गुजराती शाळा क्र.९मध्ये रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या.

स्वीप कार्यक्रम राबविण्यासाठी गुरुवारी (दि.४) महापालिकेचे आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या अध्यक्षतेखाली स्वीप पथक प्रमुख अधिकारी पालिका मुख्य अभियंता संजय जगताप व गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महापालिका मुख्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकित आयुक्तांनी नवमतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांमध्ये मतदान जनजागृती विषयक कार्यक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या. त्याबरोबरच दिव्यांग, ज्येष्ठ लोक, ट्रान्सजेंडर, महिला बचत गट, मोठमोठ्या सोसायट्यांमध्येदेखील मतदान जनजागृती विषयक कार्यक्रम राबविण्याबाबत सांगितले, तसेच आत्तापर्यंत झालेल्या जनजागृती कार्यक्रमाचा त्यांनी आढावा घेतला.

आयुक्तांच्या सूचनेप्रमाणे मावळ मतदारसंघ पनवेल विधानसभा मतदारसंघ अंतर्गत स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना शक्तीचा वापर करून सुंदर अशी चित्रे, रांगोळ्या व घोषवाक्य लिहिली.

# नवी मुंबई आयुक्तांकडून शिरवणे शाळेची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची शिरवणे येथील शाळा क्र. १५ येथे भेट देत पाहणी केली. शाळा हे विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे सर्वात प्रभावी माध्यम असल्याने इमारतीमधील स्वच्छतेमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

नीटनेटकेपणाकडे विशेष लक्ष देतानाच वर्ग खोल्यांच्या स्वच्छतेकडेही विशेष लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. स्वच्छता व नीटनेटकेपणाच्या दृष्टीने शाळेतील वापरात नसलेले टाकाऊ सामान निर्लेखित करण्यापूर्वी व्यवस्थित रचून ठेवण्याची दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यामध्येही सुधारणा करण्याचे निर्देश दिले. मुलांच्या पिण्याच्या पाण्याच्या अ‍ॅक्वा मशिन्सचीही पाहणी केली. त्यांची देखभाल दुरूस्ती वेळच्या वेळी होईल याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश दिले. विद्यार्थ्यांना आधुनिक स्वरूपातील डिजीटल शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वर्गांमध्ये असलेले डिजीटल बोर्ड कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेला उपलब्ध करून देण्यात आलेल्या शिक्षण पूरक साहित्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी नियमित वापर करण्याच्या सूचना दिल्या.

# 'मतदानासाठी प्रभावी जनजागृती करावी'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. संपूर्ण जिल्ह्यात अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सर्व विभागांनी कृती आराखडा तयार करून त्याची समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.



मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक शुक्रवारी (दि.५) जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृश्यप्रणालीद्वारे घेण्यात आली. या बैठकीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी स्वीप भरत वाघमारे, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे, तहसीलदार उमाकांत कडनोर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, लोकशाहीचा उत्सव म्हणजे मतदान प्रक्रिया होय. या उत्सवात प्रत्येक मतदाराने आपला सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक मतदाराला मतदानासाठी प्रवृत्त करावे. जिल्ह्यातील सर्व मतदारांपर्यंत मतदान केंद्रांची माहिती पोहोचवावी, तसेच मतदान केंद्रांवर वीज, पाणी, मंडप यासह सर्व मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, जिल्ह्यातील सर्व घटकांच्या प्रबोधनासाठी प्रयत्न करावेत, असे सांगितले.

### आदिवासी क्षेत्रासाठी विशेष मोहीम

आदिवासी, कातकरी समाजाचे मतदान वाढविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जावळे यांनी दिले. जे रोजंदारी जाणारे आहेत त्यांच्या आस्थापनांशी संपर्क साधून भरपगारी सुट्टी देणे शक्य आहे का हे तपासावे, तसेच जेथे सुट्टी देणे शक्य नसेल त्या ठिकाणी दोन तासांची सवलत देण्याबाबत सूचना द्याव्यात, तसेच या मतदारांचे पहिल्या सत्रात मतदान घेण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी तसेच निवडणूक यंत्रणांनी दक्षता घ्यावी असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

# नेरळमधील चोरटे पोलिसांच्या ताब्यात

## तीन गुन्ह्यांची उकल

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ शहरात मोबाईल चोरी तर दुकानातील पैसे चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना पोलिसांनी टीमच्या मदतीने जेरबंद केले आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील आर्डे गावात बांधकाम व्यावसायकाच्या अज्ञात चोरट्यांनी रिक्षा भरून लोखंडी प्लेट चोरल्या होत्या. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अधिकारी शिवाजी ढवळे यांनी लागलीच पोलीस पथक तयार करीत सीसीटिव्ही कॅमेराच्या सहाय्याने अंबरनाथ येथून तिघांना ताब्यात घेतले.

शहरात मोहसीन या बाजारमार्केटमध्ये डॉ. माळी यांच्या क्लिनिकमध्ये घुसून चोरट्याने येथील नर्सचा मोबाईल चोरला होता. महिलेने पोलिसांत तक्रार केली. मोबाईल चोरी करणाऱ्यास पोलिसांनी तांत्रिक आधारे बदलापूर येथील २५ वर्षीय सदानंद राजेंद्र कोळी या आरोपीस घरातून पकडून आणले व चोरी केलेला मोबाईल हस्तगत केला. बाजारपेठेत एका किराणा मालाच्या दुकानात पैसे चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलालादेखील पोलिसांनी पकडले आहे. हा मुलगा खोपोली येथील असून त्याच्याकडून रक्कम हस्तगत केली.

# उत्सव लोकशाहीचा, सहभाग नागरिकांचा!

## मतदार जनजागृती अभियानास उदंड प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मुंबई उपनगर जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मतदार जनजागृतीमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पथनाट्य, निवडणूक प्रतिज्ञा आणि महिला बचत गटांच्या माध्यमातून मतदार जनजागृतीतून मतदानाचे महत्त्व पोहचविण्यात येत आहे.



जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. सुभाष दळवी हे मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघात मतदार जनजागृतीविषयक उपक्रम राबवित आहेत. नवमतदारांची संख्या वाढावी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.



जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. पथनाट्य आणि निवडणुकीची प्रतिज्ञा अशा नावीन्यपूर्ण उपक्रमातून मतदारांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मतदानासंदर्भात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठीही अभियानातून नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदान जनजागृती अभियान (स्वीप) अंतर्गत वांद्रे पश्चिम विधानसभा मतदारसंघातील एच. पश्चिम विभागातील बचत गटांनी रेल्वे कर्मचारी वसाहत वांद्रे (पश्चिम), एफ उत्तर विभागात सायन सर्कल (सायन कोळीवाडा विधानसभा मतदार संघ)तसेच वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघातील एच/पूर्व विभागातील बचत गटांनी एच/पुर्व विभाग कार्यालय प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व) याठिकाणी निवडणूक प्रतिज्ञा घेऊन मतदानाचा हक्क बजावण्याचा निर्धार केला. नवमतदारांना मतदानाचे महत्त्व समजावे आणि त्यांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी व्हावे यासाठी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

# उष्णता वाढली! दुपारी रस्ते ओसाड; नागरिकांना शीतपेयांचा आधार

**रोहे : प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सूर्यनारायण तापण्यास सुरुवात झाली आहे. एप्रिल महिन्यात सूर्यनारायण आग ओखत असल्याचे दिसून येत आहे. वाढत्या उष्णता रोखण्यासाठी नागरिक बाहेर पडताना टोपी, रुमाल, गॉगल्स, स्कार्प, छत्रीचा वापर करताना दिसत आहेत. विशेषतः महिला व लहान मुले यास वृद्धांची जास्त काळजी घेण्यात येत आहे.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दुपारी ११.३०-१२ वा.नंतर नागरिक घराबाहेर कमी प्रमाणात पडताना दिसत आहेत. सायंकाळी ४ वाजल्यापासून पुन्हा रहदारी दिसून येत आहे. शहरातील रस्ते कॉंक्रिटीकरण झाल्याने तापत असल्याने व उष्णतेमुळे दुपारी शहरातील रस्ते ओसाड पडत आहेत. रस्त्यावर माणसे दिसत नाहीत. जवळजवळ रस्त्यावर वाहतूक नसल्याचे दिसून येत आहे.

उष्णता व गरमीमुळे नागरिकांची लाहीलाही होताना दिसत आहे. त्यामुळे बाजारहाटासाठी, शासकीय कामासाठी व कारखान्यात कामानिमित्ताने येणारे कामगार शीतपेयाचा आधार घेताना दिसत आहेत. उसाचा रस, लिंबू सरबत, ताक, लस्सी, कोकम सरबत, पन्हं व अन्य शितपेय घेताना दिसत आहेत.

या शितपेयांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. दुसरीकडे कलिंगडाची ही मागणी वाढली आहे. काही ठिकाणी कलिंगड खरेदी करीत असताना दुकानात कलिंगड खाताना दिसत आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे दुपारी बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदीच्या पात्रात बच्चे कंपनी पोहण्याचा आनंद लुटताना दिसत आहेत. लहान मुलांसह तरुण व मोठी माणसे ही रोहा शहर, अष्टमी सह ग्रामीण भागात नदीच्या पात्रात पोहताना दिसत आहेत. सुट्टीच्या दिवसात बच्चे कंपनी पोहण्याचा आनंद घेताना दिसत आहेत.

काही ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या आहेत. या शाळेत जाणारे विद्यार्थी शाळा सुटल्यानंतर घरी येताना भर उन्हात त्यांची दमछक होताना दिसत आहे. उन्हाळ्यात रस्त्यावरील झाडांच्या सावलीचा आधार प्रवाशांना होता, परंतु आता रस्त्यावरील झाले ही नाहीसे झाल्याचे दिसून येते.

# हॉटेल व्यावसायिकांसह मद्यविक्री करणाऱ्यांवर नजर

## पुरवठा साखळी व्यवस्थापन ॲपवर द्यावी लागणार माहिती

**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व हॉटेल व्यावसायिक व मद्यविक्री व्यावसायिकांवर नजर ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाद्वारे पुरवठा साखळी व्यवस्थापन ॲप सुरू करण्यात आले आहे. या ॲपमध्ये आता दररोजची मद्यखरेदी व विक्रीची माहिती संबंधित व्यावसायिकांना द्यावी लागणार आहे.



सर्वच हॉटेल व मद्यविक्री करणाऱ्या व्यावसायिकांना आता सप्लाय चेन मॅनेजमेंट ॲपद्वारे दैनंदिन मद्यखरेदी व विक्रीची माहिती द्यावी लागणार आहे व या माहितीवर राज्य निवडणूक आयोग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे लक्ष राहणार आहे. या ॲपमुळे चोरून दारू खरेदी विक्री, बनावट भेसळयुक्त दारू विकता येणार नाही, तसेच नेहमीपेक्षा जास्त मद्यविक्री दिसून आल्यास त्याबाबत चौकशीसुद्धा करण्यात येणार आहे. त्याने विशिष्ट लोकांना प्रमाणापेक्षा जास्त मद्यविक्री केली असेल तर लायसन्ससुद्धा निलंबित होण्याची दाट शक्यता आहे.

या ॲपमुळे आता व्यवहार सुरळीत व सुरक्षित दिसून येत आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलातसुद्धा वाढ होणार असून कारभारात पारदर्शकता येत असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# अपघात करून पसार झालेला दुचाकीस्वार पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव वेगाने दुचाकी चालवून एका पदचाऱ्याला धडक देऊन पसार झालेल्या दुचाकीस्वारास पनवेल शहर पोलिसांनी केवळ नावावरून सखोल तपास करून ताब्यात घेतले आहे.




पनवेलजवळील टी पॉईंट ते कळंबोली सर्कल जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून करंजाडे सनसेट पॉईंट ब्रीजजवळ आरोपी मोहम्मद सादिक अन्सारी (वय २१ रा.रोडपाली) याने तेथून जाणाऱ्या चंद्रकांत हणमंतराव पट्टण याला धडक देऊन स्वतःसुद्धा पुढे जाऊन धडकला. परिसरातील नागरिकांनी या तिघांना तातडीने एमजीएम कामोठे रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यासाठी घेऊन गेले होते, परंतु तेथील आयसीयूजवळ उभे असलेल्या पहारेकऱ्याला मोहम्मद अन्सारी याने आपले नाव सांगून तो उपचारार्थ दाखल न होता तेथून निघून गेला होता. दरम्यान चंद्रकांत पट्टण यांचा या अपघातात मृत्यू झाल्याने या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राजरत्न खैरनार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हनुमंत आहिरे, पोलीस नाईक संतोष कोळंबेकर आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेत असताना तेथील पहारेकऱ्याने सांगितलेल्या नावावरून कळंबोली व रोडपली परिसरात शोध घेतला.

संबंधित आरोपीच्या भावाची माहिती मिळाली व त्याला ताब्यात घेऊन या गुन्ह्यासंदर्भात विचारले असता, त्यांनी आपल्या भावाला बिहार येथील मूळगावी लपवले असल्याचे तसेच गुन्ह्यातील गाडी ही रोडपाली गणेश पार्किंग येथे लपवली असल्याचेही सांगितले. त्यानुसार पोलिसांनी ही गाडी ताब्यात घेतली आहे व आरोपीला बिहार येथून ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांच्या सतर्कतेमुळे व सखोल तपासामुळे मृत चंद्रकांत पट्टण यांना न्याय मिळाला आहे.

# विरार-अलिबाग मार्गिकाबाधितांना निवडणुकीनंतर मिळणार मोबदला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमध्ये पनवेल तालुक्यातील ४४ गावांची जमिनीचे क्षेत्र बाधित होत असून अद्याप भूसंपादनाचा मोबदला मिळू शकलेला नाही. पनवेलच्या प्रांत अधिकाऱ्यांच्या कार्यालयाने लोकसभा निवडणुकीमुळे भूसंपादनाच्या मोबदला वाटपाच्या कामाला स्थगिती दिल्याचे फलक लावला आहे. त्यामुळे आता हा मोबदला निवडणुकीनंतर मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे अनेक सरकारी कामे ठप्प झाली आहेत. निवडणूक आयोगाचे काम महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असल्याने इतर कामांना स्थगिती देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे.

मुंबई-वडोदरा महामार्गाचे काम ५० टक्के पूर्ण झाल्याने या मार्गाचे काम पनवेल तालुक्यातील मोरबे गावापर्यंत जोरदार सुरू आहे, परंतु या मार्गाचा पुढील भाग म्हणजे विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचा पहिला टप्पा अद्याप भूसंपादन पूर्ण न झाल्याने सुरू झालेले नाही.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रखडलेली दरनिश्चितीची प्रक्रिया काही दिवसांत केली, मात्र त्यानंतर लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता जाहीर झाल्याने भूसंपादनाचा मोबदला गावकऱ्यांना देण्यात तांत्रिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत.

सध्या पनवेलचे प्रांत अधिकारी कार्यालयाकडून मोरबे गावातील बाधित शेतजमिनींच्या मालकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. या नोटीसीमध्ये कोणकोणती कागदपत्र सादर करावी याची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली आहेत. मोरबेप्रमाणे इतर ४३ गावांमध्ये ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# निवडणूक प्रशिक्षण पनवेल शहरात घेण्याची मागणी

**कळंबोली : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर आता कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देण्याची वेळ आणि काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. सरकारी यंत्रणा ही सज्ज झाली आहे, मात्र निवडणुकीचे प्रशिक्षण घेण्यासाठी पनवेलपासून १० ते १२ किमी अंतरावर असलेल्या शेडुंग येथील छत्रपती शिवाजी विद्यापीठात जावे लागणार आहे. त्यामुळे हे प्रशिक्षण पनवेल शहरात घेण्यात यावे, अशी मागणी कर्मचाऱ्यांमधून करण्यात येत आहे.

लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागल्याने सर्वत्र सरकारी यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूकच्या कामाचे प्रशिक्षण देण्यासाठीही पनवेल तहसील कार्यालयकडून विविध सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रथम प्रशिक्षणासाठी पत्रही देण्यात आले आहे. मावळ लोकसभेसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण हे शेडुंग येथील छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या जागेमध्ये करण्यात आले आहे. या ठिकाणी जाणे खूपच जिकरीचे आहे. एकतर उन्हाच्या झळा सहन होत नाहीत. पनवेलपासून शेडुंगला जाण्यासाठी असलेल्या महामार्गावर अवजड वाहनांची खूप मोठी वर्दळ असते. निम्म्यापेक्षा जास्त या महिला कर्मचारी वर्ग काम करणार आहेत. याबाबत प्रशासनाने लक्ष देऊन हे प्रशिक्षण पनवेल शहरात देण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

याबाबत पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, एकाच वेळेला १४०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पनवेलमध्ये कुठेही संयुक्त जागा नसल्याने अखेर शेडुंग येथील जागा निवडली असल्याचे सांगितले आहे.

# लायन्स क्लबतर्फे मुलींना सॅनिटरी पॅडचे वितरण

**उरण : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब नवी मुंबईच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील किशोरवयीन मुलींसाठी सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले.

लायन्स क्लबच्या अध्यक्ष पूनम वलेशा तसेच सदस्या दीपा मोर्या, बिल्किश सुलताना व ॲड. दिव्या लोकरे यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, विद्यालयातील एच. आर. पाटील, सी. एम. पाटील, सी. एन. ठाकूर, एस. एस. ठाकूर, द्रौपदी वर्तक, वृषाली म्हात्रे, योगिता पाटील, उर्मिला गोंधळी, सुजाता शेलार आणि इतर शिक्षिका, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

लायन्स क्लबतर्फे इ. सहावी ते नववीच्या विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. आर. पाटील यांनी आभार मानले.





**पनवेल : प्रगतशिल शेतकरी संजीव प्रभाकर समेळ यांच्या बसझिना (वाडा कोलम) या गावठी भात बियाण्याला भारत सरकारच्या कृषी विद्यापीठाकडून पेटंट प्रमाणपत्र देण्यात आले आहे. याबद्दल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी संजीव समेळ यांचे अभिनंदन केले. या वेळी पटवर्धन हॉस्पिटलचे सेक्रेटरी राजीव समेळ, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरश नेतकर, उपाध्यक्ष ॲड. चिन्मय समेळ, ॲड. तन्मय समेळ आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयास मूल्यांकन समितीची भेट

## कर्मवीर पारितोषिकासाठी केले मूल्यांकन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने दरवर्षी विशिष्ट मानांकनाद्वारे मूल्यमापन करून विविध शाखांना कर्मवीर पारितोषिक दिले जाते. यावर्षी दिल्या जाणाऱ्या पारितोषिकासाठी संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजला नामांकन प्राप्त झाले. त्या अनुषंगाने मूल्यमापन करण्यासाठी संस्थेच्या मूल्यांकन समितीने गुरुवारी (दि.४)विद्यालयास भेट दिली.



संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ॲड. एम. के. खामकर यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यांकन समितीत मध्य विभागाचे विभागीय अधिकारी आर. एस. साळुंखे, एनकूळ येथील महर्षी शिंदे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक सुरेश दादासाहेब बोटे, उंब्रज येथील महात्मा गांधी विद्यालयाचे माजी लेखनिक दिलीप परबती गंगावणे आदींचा समावेश होता.

या वेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष वाय. टी. देशमुख, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, संस्थेचे लाईफ मेंबरद्वय रवींद्र भोईर, प्रमोद कोळी, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, उमेश पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, चित्रलेखा पाटील, शितलकुमार म्हात्रे, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, द्रौपदी वर्तक, चारुशीला ठाकूर, वृषाली म्हात्रे, योगिता पाटील, गणेश भोईर, प्रणाली पाटील, ज्युनिअर कॉलेज प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजेंद्र चौधरी, राजू खेडकर, माणिक घरत आदी उपस्थित होते.

# चैत्राच्या आगमनाने बहरली रंगीबेरंगी फुले

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रणरणत्या उन्हामध्ये झाडावेलींना आलेल्या विविध प्रकारच्या फुलांमुळे निसर्गाच्या सौंदर्यसृष्टीत भर घातली जात आहे. चैत्राच्या आगमनाने जणू ही फुले बहरली असून रणरणत्या उन्हात ही फुले रंगांची उधळण करीत असल्याचा भास वाटसरूंना होत आहे.



वृक्ष -वेलींवर आलेली चमकदार रंगाची सुंदर फुले बहरली असून चैत्र महिन्यामध्ये याच वृक्षांना बहार येत असल्यामुळे मनाला एक प्रकारचा आनंद देत असतात. उष्ण व दमट वातावरणात चांगली वाढ असल्यामुळे शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला अशा विविध ठिकाणी ही फुले आढळून येतात.

सध्या उन्हाळा असल्याने ही झाडे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. काही फुलांना गंध नसला तरीही त्याचे सौंदर्य मनाला भुरळ घालत असतात. अशी नानाविध जातीची फुले चैत्र व वैशाखात बहरतात. हिरव्यागार पानातून डोकावणारे फुले स्वत:च्या वेगळेपणाची साक्ष देत असतात, याची अनुभूती पाहावयास मिळत आहे.

चैत्राच्या उन्हाने होरपळणाऱ्या जिवांना एखाद्या हिरव्यागर्द वृक्षांचे दर्शन होणे, त्यातच हिरव्या पानांतून लालचुटूक फुलांचे डोकावणे मनाला आनंदी करते.

सृष्टीवर इतर वृक्षांची पानगळ होत असतानाच काही झाडे मात्र आपले अस्तित्व सांभाळून असतात. पाने, फुले याच दिवसात बहरून येतात. कुठे एखाद्या उजाड डोंगरमाथ्यावर हरवलेले एखादे रानफूल नजर वेधून घेते. या उन्हाच्या छोटेसे फूल कसे बरे टवटवीत आहे? असा विचार मनाला पडतो. निसर्गाची ही किमया उन्हाळ्यात अनेक फुलांच्या बाबतीत पहावयास मिळत आहे. सध्या उन्हाचा पारा सर्वांनाच हैराण करीत आहे. अशा उन्हात या फुललेल्या फुलांना पाहूनच मनाला व डोळ्यांना थंडावा मिळत आहे.

# गुढीसाठी साखरेच्या माळा बाजारात दाखल

**उरण : वार्ताहर**

गुढीपाडवा मंगळवारी (दि.९) असल्याने गुढीसाठी साखरेच्या माळेला विशेष महत्त्व आहे. या साखरेच्या माळा उरण बाजारात विकावयास आल्या आहेत. पारंपरिक पद्धतीनुसार साखरेची माळ गुढीसाठी वापरल्या जातात. त्यासाठी उरण बाजारात महाराष्ट्र स्वीट, हरी ओम जनरल स्टोअर्स, हरीलाल जनरल स्टोअर्स येथे आल्या असून नागरिक माळा खरेदी करतांना दिसत आहेत. माळा २० रुपये, ५० रुपये या दराने विकल्या जात असून सफेद, लाल, पिवळे अशा विविध रंगाच्या माळा गविकत आहोत, असे महाराष्ट्र स्टोअर्सचे भगवान सेवक यांनी सांगितले.

# युईएस कॉलेजमध्ये मतदान जनजागृती अभियान

**उरण : वार्ताहर**

तहसीलदार कार्यालयातर्फे युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये गुरुवारी (दि.४) मतदान जनजागृती अभियानांतर्गत पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. मतदान करताना काय करावे व काय करू नये या विषयावर विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी तहसीलदार उद्धव कदम, गटशिक्षण अधिकारी प्रियंका म्हात्रे, स्वीप पथक सदस्य रुपेश पाटील, पथनाट्य दिग्दर्शक किशोर पाटील, सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला युईएस सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता यांच्या हस्ते तहसीलदार उद्धव कदम यांना तर ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया यांच्या हस्ते गटशिक्षण अधिकारी प्रियंका म्हात्रे यांना तसेच पथनाट्यातील सर्व कलाकारांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवर तसेच सर्व विद्यार्थ्यांनी मी मतदान करणार... आपल्या देशाचे भविष्य घडवणार या लोकसभा उरण विधानसभा मतदारसंघाच्या बोर्डावर स्वाक्षऱ्या केल्या.



## संपादकीय

# अठरावं वरीस मोक्याचं

नुकत्याच झालेल्या पाहणीनुसार मतदानाचा अधिकार मिळूनदेखील त्यापैकी फक्त ३८ टक्के पात्र तरुण-तरुणींनी मतदार ओळखपत्र घेतले आहे. बहुतांश तरुणाई मतदार यादीत आपले नाव नोंदवण्यासाठी ना कुठल्या सरकारी कार्यालयात फिरकली, ना त्यांनी ऑनलाइन नोंदणी केली. महाराष्ट्रात तर फक्त २७ टक्के तरुणांनी मतदार यादीत आपले नाव नोंदवले आहे. असे का घडले असावे याचा विचार आता समाजशास्त्रज्ञ आणि राजकीय पंडितांनी करायला हवा आहे.


**वयाची १८ वर्षे पूर्ण झाली की भारतीय लोकशाही प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार बहाल करते. वय वर्षे १८ ही आपल्या देशात सज्ञानतेची मर्यादा आहे. या वयात तारुण्याचा उत्साह असतो. चौकसपणे जगाकडे पाहण्याची दृष्टी मिळते. याच वयात समाजभानदेखील येत असते. सुदैवाने भारतात तरुणाईची संख्या लक्षणीय आहे. तब्बल ६७ टक्के लोकसंख्या ही तरुण वयाची असल्यामुळे 'उत्तम मनुष्यबळ असलेला देश' असा लौकिक जगभर होताना आपल्या देशास अनुभवास येतो. अठराव्या वर्षी शिक्षण संपते असे मात्र होत नाही. किंबहुना, कारकीर्द कुठल्या क्षेत्रात करायला हवी याची जोरदार धडपड याच वयात सुरू होते. त्यामुळेच कदाचित तरुण पिढीचे निवडणुकांकडे म्हणावे तसे लक्ष गेलेले दिसत नाही. भारतात सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या आहेत. मतदार याद्यांची तपासणी, दुरुस्ती अशी कामे निवडणूक यंत्रणेने युद्धपातळीवर हाती घेतली आहेत, पण राजकारण म्हटले की दोन हात दूर राहिलेलेच बरे असा प्राथमिक विचार नकळतपणे मुलांच्या मनावर बिंबवला जातो. राजकारण हे नतद्रष्टांचे अखेरचे आश्रयस्थान आहे ही लाडकी म्हण वारंवार वापरली जाते. दुर्दैवाने आपल्याकडील राजकारणाचे वर्तमानातील चित्र फारसे कौतुकास्पद नाही. विविध राजकीय पक्षांचे नेते ज्या प्रकारे परस्परांवर चिखलफेक करतात, त्याने शिक्षणाकडे वळलेली तरुणपिढी दुरावत असेल का याचाही विचार करायला हवा. आधी सांगितल्याप्रमाणे शिक्षणाच्या वाटा धुंडाळण्याच्या काळात मतदानासारख्या कृतीकडे लक्ष देण्याचे भान ना विद्यार्थ्यांना असते ना त्यांच्या पालकांना. मतदान ही काही प्राधान्यक्रमाने करण्याजोगी गोष्ट नाही अशीच धारणा सर्वसामान्यांच्या मनात दिसून येते. शहरी भागात विशेषत: मध्यमवर्गीयांमध्ये मतदान प्रक्रियेविषयी असलेली उदासीनता काही नवीन म्हणता येणार नाही. तसे पाहू गेल्यास या जुन्याच दुखण्याची लागण तरुण पिढीलादेखील झाली आहे असे म्हणावे लागेल. वास्तविक मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत वारंवार होत असते. भारतासारख्या प्रचंड मोठ्या लोकशाही देशात कुठल्या न कुठल्या निवडणुका होतच असतात. गेल्या काही वर्षांत तरुण आणि महिला मतदारांची संख्या लक्षणीयरित्या वाढत असल्याचे निरीक्षण मध्यंतरी निवडणूक आयोगानेच नोंदवले होते. देशाच्या जडणघडणीमध्ये प्रत्येक नागरिकाचा छोटामोठा वाटा असतो. आजची तरुणाई हीच देशाचा भविष्यकाळ घडविणार आहे. याच भावनेने मोदी सरकारच्या प्रोत्साहनामुळे 'मेरा पहला व्होट देश के लिए' असे घोषवाक्य असलेली देशव्यापी मोहीम हाती घेण्यात आली होती. अर्थात, शंभरातील ३८ नवमतदारांनी नोंदणी केली असेल तर तीही आशादायक बाब म्हटली पाहिजे. अशा प्रकारची स्थित्यंतरे एका रात्रीत किंवा एका निवडणुकीदरम्यान कधीच होत नाहीत. ही अभिसरणाची प्रक्रिया आहे. त्यामुळे येत्या काळात ही टक्केवारी वाढणार यात शंका नाही. नवमतदार आणि महिलांची ही मते कोणाला जाणार हे सारा देश ओळखून आहे!**

# भारतीय जनता पक्षाचा आज स्थापना दिन

६ एप्रिल १९८० हा भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस. स्थापनेपूर्वी हा पक्ष भारतीय जनसंघ म्हणून ओळखला जात होता. स्व. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या आदर्श विचारप्रणालीनुसार जनसंघाची वाटचाल सुरू होती. विचारांना राष्ट्रहिताचे अधिष्ठान असेल तर राजकीय भूमिका कधीच चुकणार नाही या उपाध्याय यांच्या सल्ल्याप्रमाणे त्यावेळी जनसंघाची वाटचाल प्रखर राष्ट्रवादाच्या मुद्द्यावर सुरू राहिली...

भारतीय जनता पक्षाची विचारधारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबत संलग्न आहे. सध्याच्या घडीला संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये भाजपचे बहुमत असून विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपचे सदस्य आहेत. १९५१ साली श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. जनसंघ हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजकीय अंग मानले जात असे. काँग्रेस व तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडून पाकिस्तानचे होणारे लांगुलचालन रोखणे व भारतामधील हिंदूंचे हित जपणे ही जनसंघाची उद्दिष्टे होती. स्थापनेनंतर जम्मू आणि काश्मीर भारतामध्ये संपूर्ण सामावून घेतला जावा अशी आग्रही भूमिका जनसंघाने घेतली व यादरम्यान निदर्शने करताना अटक झालेल्या मुखर्जी यांचे तुरुंगातच निधन झाले. दीनदयाल उपाध्याय व त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी या नेत्यांनी जनसंघाची सूत्रे हाती घेतली. १९५२ सालच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीमध्ये जनसंघाला केवळ तीन जागांवर विजय मिळाला. १९६७च्या देशव्यापी विधानसभा निवडणुकांमध्ये जनसंघाने अनेक लहान प्रादेशिक पक्षांसोबत युती केली व मध्य प्रदेश, बिहार व उत्तर प्रदेश राज्यांमध्ये सरकारे स्थापन केली.

१९७७ साली आणीबाणी उठल्यानंतर जनसंघाने भारतीय लोकदल, काँग्रेस (ओ), सोशालिस्ट पार्टी इत्यादी पक्षांसोबत एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई इत्यादी नेते जनता पक्षाचे सदस्य होते. १९७७च्या लोकसभा निवडणुकीमध्ये जनता पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले व मोरारजी देसाई पंतप्रधान, तर अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री बनले, परंतु सरकार १९८० साली कोसळले व जनता पक्षाचे विघटन झाले. जनता पक्षाच्या विघटनानंतर ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी पक्षाचे




पहिले अध्यक्ष बनले.

भाजपचा चेहरामोहरा जनसंघासारखाच होता. पक्षाच्या घटनेनुसार हा पक्ष राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, गांधीजींनी सुचवलेला समाजवाद, सकारात्मक सेक्युलॅरिझम अर्थात सर्वधर्मसमभाव आणि मूल्याधिष्ठित राजकारण करण्यासाठी कटिबद्ध आहे. पक्ष आर्थिक व राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणाच्या बाजूने उभा असल्याचेही पक्षाच्या घटनेत म्हटले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांनीच जनसंघ स्थापन केला होता. त्यामुळे त्याचा शाखाविस्तार राष्ट्रीय विचारसरणीच्या महाराष्ट्रात होणे स्वाभाविकच होते. स्थापनेपासूनच जनसंघाचे कार्य महाराष्ट्रात सुरु झाले. अर्थात, विविध राजकीय विचारधारा, विशेषतः काँग्रेसची विचारधारा, महाराष्ट्रात प्रचलित असल्याने हे काम तेवढेसे सोपे नव्हते. येथील वाटचालीत जनसंघासमोरील आव्हाने जेवढी मोठी होती, तेवढीच मोठी आव्हाने दुसऱ्या स्वातंत्र्यानंतर १९८०मध्ये स्थापन झालेल्या भाजपसमोरही होती. पूर्वी जनसंघ असतांना जनसंघाचा दिवा घरोघरी लावा असे कार्यकर्ते म्हणायचे, कारण पूर्वीच्या जनसंघाची निशाणी दिवा (पणती) होती. विरोधक (काँग्रेस) जनसंघ व दिव्याची खिल्ली उडवायचे. त्या वेळी विजय दूरच, परंतु उमेदवार मिळणे कठीण जायचे. आता निवडणूक जिंकल्यानंतर कार्यकर्त्यांना जसा आनंद होतो तसाच आनंद तेव्हा जनसंघाला उमेदवार मिळाल्यानंतर व्हायचा. महाराष्ट्रात त्या वेळी स्व. उत्तमराव पाटील, स्व. रामभाऊ म्हाळगी, स्व. रामभाऊ गोडबोले, स्व. मोतीराम लाहने यांनी खूप कष्ट करून जनसंघ वाढवला. काँग्रेसला योग्य पर्याय म्हणूनही भाजपचे नाव त्या वेळी होऊ लागले. याचबरोबर भाजप एका-एका राज्यात सत्तेत येऊ लागला व अन्य पक्षांचे लोक भाजपत येऊ लागले. आजही योग्य विचारसरणी घेऊन अनेक लोक, कार्यकर्ते भाजपमध्ये येत आहेत. तथापि, सत्ता मिळविणे व योग्य राबविणे हे जरी पक्षांचे अंतिम लक्ष्य असले तरी पक्षाची ध्येय-धोरणे पायदळी तुडवली जाणार नाहीत याची काळजी घेण्याचे काम पक्ष वाढत असताना अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण आडवाणी यांनी प्रकर्षाने घ्यावी लागली. गेल्या ३७ वर्षांत भाजपचा प्रवास गावपातळीपासून तर थेट देशाच्या पंतप्रधानपदापर्यंत झाला.


या काळात पक्षात सत्तसंपादनाच्या हेतूने अनेक पक्षांचे नेते व कार्यकर्ते आले. ज्यांना पक्षाची विचारधारा, ध्येय धोरणे आवडली, रुचली, पटली ते थांबले व जे फक्त सत्तासुंदरीकडे पाहून पक्षात आले ते परत बाहेर गेले. देशाचे पंतप्रधानपद मिळाल्यानंतर अटलजींनी योग्य धोरणे राबवून देशाला गौरव प्राप्त करून दिला. अणुस्फोट चाचणी, कारगिल युद्धात विजय प्राप्त करून भारत स्वयंसिद्ध असल्याचे अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने दाखवून दिले. या काळात इतर राष्ट्रीय पक्षांमध्ये फाटाफूट होऊन अनेक वेगवेगळे पक्ष तयार झाले. थोड्या फार प्रमाणात त्यांना राज्य व केंद्र स्तरावर त्यांना यश आले, तथापि या काळात भाजपातून बाहेर पडून वेगळा पक्ष स्थापन करून राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर एकही पक्ष यशस्वी होऊ शकला नाही. हेच पक्षाच्या यशाचे गमक आहे.

पक्षाचा इतिहास, वाटचाल, शिस्त, विचारधारा, या सर्व कार्यकर्त्यांमध्ये यावी, जेणेकरून चांगल्या कार्यकर्त्यांचा शिस्तबद्ध पक्ष म्हणून भाजपची प्रतिमा यापुढेही उजळत राहील, हीच या स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा!

**-संजीव वेलणकर**

**अपने मन में एक लक्ष्य लिए**
**मंज़िल अपनी प्रत्यक्ष लिए**
**हम तोड़ रहे हैं जंजीरें**
**हम बदल रहे हैं तस्वीरें**
**ये नवयुग है, नव भारत है**
**खुद लिखेंगे अपनी तकदीरें**
**हम निकल पड़े हैं प्रण करके**
**अपना तन-मन अर्पण करके**
**जिद है एक सूर्य उगाना है**
**अम्बर से ऊँचा जाना है**
**एक भारत नया बनाना है**
**एक भारत नया बनाना है**

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**





## बदलते तंत्रज्ञान

# ब्लूटूथमध्ये 'या' गोष्टींमुळे डिव्हाइसची सिक्युरिटी धोक्यात

ब्लूटूथ तंत्रज्ञानामुळे हल्ली लॅपटॉपपासून ते स्मार्टवॉचपर्यंत सर्व डिव्हाइस एकत्र लिंक करणे अतिशय सोपे झाले आहे,



मात्र ब्लूटूथमुळे होणारे संभाव्य धोके प्रत्येकाने समजून घेणे महत्त्वाचे आहे. तुमचा व्यक्तिगत डेटा व गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी हे धोके समजून घेतल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. ब्लूटूथच्या अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या १० सिक्युरिटी रिक्स जाणून घ्या.

**ब्लूजॅकिंग :** ब्लूजॅकिंग हा सायबर हल्ल्याचा एक प्रकार आहे ज्यात अनोळखी व्यक्ती ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी डिव्हाइसेसना अनपेक्षित मॅसेजेस किंवा फाइल्स शेअर करतात. यामुळे प्रायव्हसीचे उल्लंघन होऊन सेन्सेटिव्ह माहिती इतरांपर्यंत पोहचते.

**ब्लूस्नार्फिंग :** ब्लूटूथ डिव्हाइसमधील डेटाची अनधिकृतरित्या ब्लूस्नार्फिंगच्या माध्यमातून चोरी करण्यात येते. काँटॅक्ट, मेसेजेस आणि मल्टीमीडिया फाइल्सचा समावेश असतो. युजर्सला याबद्दल कोणतीही माहिती नसते. यात युजर्सची संपूर्ण माहिती मिळवली जाते.

**ब्लूबगिंग :** ब्लूबगिंग हा सायबर हल्ल्याचा एक आधुनिक प्रकार आहे. ज्यात ब्लूटूथ डिव्हाइसेसवर हॅकर्स नियंत्रण मिळवतात. युजर्सच्या परवागीशिवाय यात प्रवेश करून कॉल व मेसेजेसबद्दल माहिती मिळवण्याची अनुमती मिळते.

**डिनायल ऑफ सर्विस :** ब्लूटूथ डिव्हाईसेवर डेनियलऑफ सर्विस हा हल्ला करणे शक्य असते. यात अनधिकृत कनेक्शन रिक्वेस्ट पाठवल्या जातात आणि याद्वारे मालवेअर डिव्हाइसेसमध्ये रेंडर करण्यात येते. यामुळे डिव्हाईस वापरण्यास अनेक अडथळे निर्माण होतात व सिस्टिम क्रॅश होऊ शकते.

**इव्हजड्रॉपिंग :** ब्लूटूथ सिग्नल्स हे मर्यादित स्वरुपाचे असतात, मात्र काही विशेष आधुनिक उकरणांचा वापरकरून हल्लेखोरांना त्यावरील डेटा मिळवणे किंवा ऐकणे सहज शक्य होते. यामुळे ब्लूटूथद्वारे प्रसारित होणारा डेटा ही सेन्सेटिव्ह बाब आहे.

**मॅन-इन-द-मिडल :** एमआयटीएम या हल्ल्यांमध्ये हल्लेखोर ब्लूटूथ उपकरणांमधील कम्युनिकेशन रोखतात व डेटाची देवाणघेवाण करतात. यात माहितीची वेळ किंवा प्रायव्हसिशी छेडछाड होऊ शकते.

**ब्लूटूथ लो एनर्जी :** IoT डिव्हाइसेस आणि वेअरेबलमध्ये वापरले जाणारे BLE यामुळे सिक्युरिटीविषयक अनेक आव्हाने निर्माण होतात. BLEद्वारे उद्‌भवणारी सर्वांत मोठी समस्या म्हणजे डेटा मॅन्यूपलेशन ही आहे.

# भावगीतगायक, संगीतकार जी.एन. जोशी

जी.एन. जोशी (६ एप्रिल १९०९-२२ सप्टेंबर १९९४) हे मराठीतले भावगीत गायक होते. रानारानात गेली बाई शीळ हे त्यांचे भावगीत मराठीतले पहिले भावगीत समजले जाते. त्यांचा आज जन्मदिन आहे.



## निमित्त

जी.एन. जोशी हे मुळात उच्चशिक्षित वकील होते. एचएमव्हीत रमाकांत रूपजी या वरिष्ठ अधिकाऱ्याने जोशी यांना प्रथम आणले व नंतर तर त्यांना मराठी व शास्त्रीय संगीताच्या विभागाचे अधिकारीच करून टाकले. जी.एन. जोशी, रमाकांत रूपजी व वसंतराव कामेरकर या अधिकाऱ्यांच्या त्रयीने या भावगीतांच्या काळाला खरा आकार आणि आधार दिला. किती नव्या नव्या कलाकारांना त्यांनी हेरून प्रोत्साहन दिले व त्यांच्याकडून नेमकी रसिकांना आवडतील अशी गाणी करून घेतली त्याला तोडच नाही. शिवाय मराठी व हिंदी चित्रपटांच्या संगीताचे काम पुन्हा निराळे. अर्थात त्यात जोशी यांचा मुख्य वाटा नसला तरी स्टुडिओ उपलब्ध करून देणे, गायक व वादकांच्या रिहर्सलचे वेळापत्रक याचे ताळतंत्र पुन्हा त्यांनाच बघावे लागे. त्यात कलाकारांचा मूड सांभाळणे, त्यांना न दुखावणे ही मोठी जबाबदारी असायची. एचएमव्हीत जी.एन. जोशी यांनी हे ४० वर्षे काम लीलया सांभाळले. त्या काळात कलाकारांना लोकांसमोर येण्यासाठी एचएमव्ही हे एकच मोठे व्यासपीठ होते. त्यामुळे जी.एन. जोशी हे एचएमव्हीतले दादा अधिकारी समजले जात.

**मराठीतले पहिले भावगीत**

'रानारानांत गेली बाई शीळ गं, राया तुला रे काळवेळ नाही, ताळमेळ नाही' असे म्हणणाऱ्या एका प्रेमात पडलेल्या तरुणीचे हे मनोगत मेहेकरचे कवी ना.घ. देशपांडे यांनी लिहिले होते. जोशी यांनी ते निवडले व चाल लावून खासगी कार्यक्रमांतून म्हणायला सुरुवात केली. एका कार्यक्रमात रमाकांत रूपजी यांनी ते ऐकले व त्याची ध्वनिमुद्रिका करण्याचे ठरले.

या शीळेच्या गाण्यामुळेच जोशी यांचा एचएमव्हीत (हिज मास्टर्स व्हॉईस ग्रामोफोन कंपनीत) प्रवेश झाला व पुढे या शीळेनेच त्यांना वकिलीचे ज्ञान विसरण्यास भाग पाडले. इ.स. १९३५ साली मराठीतल्या या पहिल्या भावगीताची ध्वनिमुद्रिका निघाली आणि महाराष्ट्राच्या घरांघरांत पोहोचली. तुफान खप असलेल्या या तबकडीमुळे एचएमव्हीचा मोठा आर्थिक फायदा झाला आणि जी.एन. जोशी यांचा 'एचएमव्ही'त प्रवेश झाला.

**लिहिलेले पुस्तक**


स्वरगंगेच्या तीरी (आत्मचरित्र) या पुस्तकाचे Down Melody Lane नावाचे इंग्रजी भाषांतर Orient Longman या प्रकाशनसंस्थेने प्रसिद्ध केले आहे.

**भावगीतांच्या कॉम्पॅक्ट डिस्क्स**

जी.एन. जोशींच्या जन्म शताब्दी वर्षात म्हणजे २००९ साली एचएमव्ही कंपनीने जोशींना मानवंदना देण्यासाठी त्यांच्या आवाजातील इ.स. १९३५ सालापासूनच्या जुन्या ४३ भावगीतांच्या 'स्वरगंगेच्या तीरी' नावाचा दोन सीडींचा संच बाजारात आणला असून त्यात जोशी यांच्या आवाजातील फिरत, लयकारी, खटके-मुरके याचा आस्वाद रसिकांना घेता येतो.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**सातारा : सध्या तापमानाचा पार वर चढून कमालीची उष्णता जाणवत असल्याने अनेक पर्यटक जिल्ह्यातील मिनी काश्मीर म्हणून प्रसिद्ध असलेल्या तापोळा या ठिकाणी भेट देतात. पर्यटक येथील विविध बोट राईडचा आनंद घेत असतात.**

## आरोग्य प्रहर

# वजन कमी करण्यासाठी हळदीचे पाणी पिणे फायदेशीर



आपल्या घरात अनेक मसाले असतात. त्यांचा उपयोग जेवण बनवण्यासाठी केला जातो. परंतु अनेक मसाले आहेत त्याचा आरोग्यासाठीही फायदा होतो. हळद हा त्यातील एक प्रमुख मसाला आहे.

हळदीत अनेक औषधी गुण असतात, हळदीत अँटीऑक्सिडेंट्स, अँटीइन्फ्लेमेंटरी तसेच अँटीबॅक्टेरियल गुण असतात. त्यामुळे अनेक आजारांचा धोका कमी होतो. हळद आरोग्यासाठी फायदेशीर आहे. हळदीमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते तसेच वजन कमी होण्यासही मदत होते. यासाठी जाणून घेऊया हळदीचे पाणी कसे बनवावे आणि त्याचे इतर फायदे.

**असे होते वजन कमी** :- हळदीत पोषक तत्व असतात, त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. हळदीत पॉलेफेनॉल करक्यूमिन कम्पाऊंड असतं त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. वजन कमी करण्यासाठी पाण्यात हळद घालून प्यावे.


**असे बनवा हळद पाणी** :- हळदीचे पाणी बनवण्यासाठी हळदकुंडाची कुटलेली हळद घ्या. त्यात दोन कप गरम पाणी टाका. त्यानंतर त्यात मध मिक्स करा. पाणी थोडे कोमट झाल्यानंतर या पाण्याचे सेवन करा. शक्यतो रिकाम्या पोटी हे पाणी प्या त्यामुळे वजन लवकर कमी होण्यास मदत होती.

**हळदीचे पाणी पिण्याचे फायदे** :- हळदीचे पाणी प्यायल्यास वजन कमी होण्यास मदत होतेच, शिवाय रिकाम्या पोटी हळदीचे पाणी प्यायल्यास सांधेदुखी दूर होते. हळदीत अँटीबॅक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण असतात, त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. हळदीचे पाणी प्यायल्यास आजारांपासून लढण्याची ताकद मिळते. हळदीचे पाणी प्यायल्यास सर्दी खोकलाही दूर होतो.

हळदीचे पाणी प्यायल्यास हृदरोगाचा धोका कमी होतो. तसेच हळदीच्या पाण्याच्या सेवनाने कोलेस्ट्रॉलही कमी होतो. हळदीचे पाणी प्यायल्यास रक्ताच्या गाठी तयार होत नाही. **-डॉ. प्रमोद ढेरे**

# पर्यटकांसाठी वाहतूक पोलिसांचा प्लान तयार

## वाहतूक कोंडी टाळण्याकरिता महामार्गांवर उपाययोजना



**खोपोली : प्रतिनिधी**

शाळा व महाविद्यालयांना उन्हाळ्याची सुट्टी लागल्याने पर्यटक मोठ्या संख्येने बाहेर पडणार असून वाहनांच्या संख्येत प्रचंड प्रमाण वाढ होणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघातासारख्या घटना घडत असल्याने महामार्ग पोलीस अगोदरच सज्ज झाले आहेत. त्या दृष्टीने वाहतुकीचा आराखडादेखील बनविण्यात आला आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा महामार्गावर विकेंड आणि उन्हाळी सुट्ट्यांमुळे वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होते. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाट हद्दीत घाट सेक्शन व दुतगती महामार्ग व एनएच ४८ असा संयुक्तिक महामार्ग एकत्र येत असल्याने वाहतूक संथ गतीने सुरू असते. महामार्ग पोलिसांनी मागील वर्षीचा आढावा घेत वाहतूक कोंडीचे विघ्न टाळण्यासाठी विविध उपाययोजना तयार केल्या आहेत. वाहतुकीचे नियमन करण्यासाठी दिवसा अवजड वाहने घाट सुरू होण्यापूर्वी शोल्डर लेनवर तसेच वाहनतळ ठिकाणी थांबवून हलक्या वाहनांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

कारच्या संख्येत वाढ झाल्यानंतर वाहतूक कोंडी फोडण्यासाठी व पुणे लेनवरील लोड कमी होईपर्यंत सतत १० ते १५ मिनिटांचे ब्लॉक घेऊन मुंबई लेनवरील वाहतूक खंडाळा टनेल येथे थांबवून पुणे लेनवरील वाहतूक विरूद्ध दिशेने वळविण्यात येते व वाहतूक सुरळीत करण्यात येते.

तापमान वाढीमुळे अवजड वाहनेही बंद पडत आहेत. त्यांना क्रेन, पुलर, पोलीस केनच्या सहाय्याने लवकरात लवकर काढून वाहतुकीसाठी तिन लेन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पहिल्या लेनवर चालणाऱ्या अवजड चालकांवर खटला भरून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येत आहे.

**हे नियोजन अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) सुखविंदर सिंह, पोलीस अधीक्षक रायगड परिक्षेत्र तानाजी चिखले, पोलीस उपअधीक्षक रायगड विभाग घनःश्याम पलंगे, पोलीस निरीक्षक पनवेल विभाग गौरी मोरे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक नियमन करण्यासाठी प्रयत्नशिल आहेत.**

**-योगेश भोसले, सपोनि., बोरघाट पोलीस मदत केंद्र**

खालापूर टोल नाका येथे पी. ए. सिस्टीमद्वारे अवजड वाहनांना सूचना देण्यात येतात, तसेच जड-अवजड वाहन मालक चालक संघटनांना ६ ते ९ एप्रिलदरम्यान मुंबई-पुणे दुतगती महामार्गावर पुणे लेनवर सकाळी ६ ते दुपारी १२ वा.चे दरम्यान प्रवास टाळावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# वडखळ पोलिसांचे संचलन, दंगल नियंत्रण प्रात्यक्षिके

**पेण : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणूक शांततापूर्ण व भयमुक्त वातावरणात पार पडावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या नेतृत्वाखाली वडखळ गावात पोलीस रूट मार्च काढण्यात आला.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गवई, पोलीस उपनिरीक्षक पाटील, महिला पोलीस उपनिरीक्षक सांगळे यांच्यासह वडखळ पोलीस ठाणे १० अंमलदार, आरसीपी वडखळचे ३० अंमलदारांनी दंगल नियंत्रण प्रात्यक्षिके करून दाखविली.



# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोहा पोलिसांचा शहरात रूटमार्च



**धाटाव : प्रतिनिधी**

आगामी येणारे सण व लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, समाजकंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहून निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी रोहा तालुक्यात गुरुवारी (दि.४) रायगड जिल्हा पोलीस दलामार्फत सर्व पोलीस स्टेशनचे अधिकारी, अंमलदार त्याचबरोबर दंगल नियंत्रण पथक यांचा रूट मार्च काढण्यात आला. या वेळी पोलिसांकडून प्रात्याशिके दाखवण्यात आली.

या रूट मार्चला रोहा पोलीस स्टेशन येथून सुरुवात होऊन तीन बत्ती नाका, रोहा एसटी स्टँड, रोहा नगरपालिका, कोएसो मेहंदळे हायस्कूल, राम मारुती चौक, रोहा मोहल्लामार्गे ते पुन्हा रोहा पोलीस स्टेशन येथे समाप्त करण्यात आला.

उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, रोहा शहराचे पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, कोलाड सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते, नागोठणे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर, तसेच पाली पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण आदींसह पोलीस अधिकारी तसेच अंमलदार पोलीस वर्ग उपस्थित होते. या रूट मार्चकरिता रोह्याचे प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनीदेखील उपस्थिती लावली होती.

रोहा उपविभागीय अधिकारी शैलेश काळे यांनी येणारे सण व आगामी लोकसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस दल सज्ज आहे, असा संदेश या रूट मार्चमधून दिला.

# खोपोलीत महावितरणकडून झाडे छाटून टाकली गटारात



**खोपोली : प्रतिनिधी**

विशेष लोडशेडिंग घेऊन खोपोली महावितरणकडून वीजतारांच्या खालील व विविध ठिकाणी ट्रान्सफॉर्मरच्या परिसरातील वाढलेली झाडे, गवतची छटाई मंगळवारी केली गेली, मात्र छटाई केलेल्या झाडांच्या फांद्या, गवत व इतर कचरा महावितरणाने सार्वजनिक गटारात टाकल्याने गटारे भरली असून पालिकेचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

एका बाजूला नगरपालिकेकडून सर्वत्र स्वच्छता अभियान सुरू आहे. दुसऱ्या बाजूला महावितरण कंपनीकडून मात्र रस्त्यावर व गटारात फांद्या टाकल्याचे चित्र आहे. याबाबत नगरपालिकेकडून कोणतीही दखल घेतल्याचे दिसत नाही. याबाबत खोपोली महावितरणचे उपअभियंता मोहिते, सहाय्यक अभियंता गडरी यांना विचारले असता, वीजतारांच्या खालील झाडे व गवत वाढले होते. यामुळे वीज पुरवठ्यावर संभाव्य व्यत्यय टाळण्यासाठी ही झाडे व गवत काढण्यात आली, असे त्यांनी सांगितले, मात्र सार्वजनिक गटारात गवत व छाटलेल्या फांद्या टाकल्याबाबत काहीही बोलण्याचे टाळले.

**पुढील दोन दिवसांत फांद्या व कचरा महावितरणकडून न उचलल्यास नगरपालिकेकडून खोपोली महावितरण अभियंत्यांना नोटीस देण्यात येईल. तरीही कार्यवाही न केल्यास दंडात्मक कारवाईबाबत सूचना दिल्या जातील.**

**-पंकज पाटील,**
**मुख्याधिकारी व प्रशासक खोपोली नगरपालिका**

# वडवळ शाळेच्या विद्यार्थ्यांची प्रभातफेरीतून मतदान जनजागृती

**चौक : प्रतिनिधी**

मतदारांना जागृत करण्यासाठी प्राथमिक शाळा वडवळ यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. या रॅलीला विद्यार्थी आणि मतदारांकडून प्रतिसाद मिळाला.

निवडणूक आयोगाचे निर्देशाप्रमाणे कर्जत विधानसभा मतदारसंघात स्वीप अंतर्गत मतदान जनजागृतीकरिता विविध उपक्रम राबविले जात आहेत. प्राथमिक शाळा वडवळ यांनीही या उपक्रमात लोकशाहीप्रति आपली जबाबदारी डोळ्यासमोर ठेवून वडवळ या गावातून रॅली काढून आपला सहभाग नोंदवाला.

रॅलीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मी मतदान करणारच..., संविधान शपथ, मतदान हक्क बजावणार, अशा घोषणा देण्यात आल्या. शाळेच्या प्रांगणात रॅलीची सांगता करण्यात आली. या वेळी मुख्याध्यापक सुधाकर रामकृष्ण थळे, विजया शिंदे, राजाराम जाधव, करूणा बोंबे, हर्षा काळे उपस्थित होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शांततेत साजरी करावी

## उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वांनी शांततेत व उत्साहात साजरी करावी, असे आवाहन खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी खोपोली येथे आयोजित बैठकीत केले.



खोपोली पोलीस ठाण्यात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता सभेचे आयोजन शुक्रवारी (दि.५) सायंकाळी करण्यात आले होते. या वेळी पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत, सहायक पोलीस निरीक्षक सुजित गडदे, पोलीस उपनिरीक्षक कर्मराज गावडे, अभिजीत व्हरंबले, अलोक किस्मतराव, सुधाकर लहाने, पोलीस नाईक सतीश बांगर, पोलीस अमलदार प्रदीप खरात, तसेच माजी नगरसेवक किशोर पानसरे, कैलास गायकवाड, पत्रकार भाई ओवाळ, नगरपालिकेचे अधिकारी गजानन जाधव, कार्यकर्ते विकी गायकवाड, विविध मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते. विक्रम कदम यांनी, आचारसंहिता असल्याने कार्यकर्त्यांनी नियमांचे पालन करताना वेळेत कार्यक्रम करावे.

त्याचप्रमाणे मिरवणूक ही वेळेत काढण्यात यावी असे आवाहन करताना, मिरवणुकीला गालबोट लागू नये यासाठी काळजी घ्यावी यासाठी स्वयंसेवक नेमणूक करण्यात यावेत. त्यांना ओळखपत्र देण्यात यावे, विशेषतः मिरवणुकीत महिलांच्या सुरक्षितेची जबाबदारी आयोजकांनी घ्यावी, कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही याची पण काळजी घ्यावी, तुमच्यासोबत आमचे अधिकारी वर्ग, कर्मचारी असणार आहेतच, असे विक्रम कदम यांनी बैठकीत सांगितले. सोशल मीडियावर आलेले चुकीचे संदेश ताबडतोब डिलीट करावेत. याबाबतची माहिती आम्हाला द्यावी, असे सांगितले.

या बैठकीत विक्रम कदम यांनी उपस्थित मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून कार्यक्रम नियोजनाबाबतची माहिती घेतली. उपस्थित मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या वतीने माजी नगरसेवक किशोर पानसरे कैलास गायकवाड विकी गायकवाड यांनी मिरवणूक शांततेत होणार असल्याचे सांगितले. आभार पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत यांनी मानले.

# फणसाड अभयारण्यात रानकुत्र्यांची संख्या वाढली

## अन्य वन्यजीवही वृद्धिंगत



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील फणसाड अभयारण्यात जवळपास २५ ठिकाणी पाणवठे असल्याने मुबलक वन्यसंपदेबरोबरच वन्यजीवांचा वावर दिवसेंदिवस वाढतो आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे २०२०पासून फणसाडमध्ये रानगव्यांची संख्या वाढली असून सध्या २०पेक्षा जास्त रानगव्यांची संख्या वृद्धिंगत झाल्याचे दिसून येत आहे. याशिवाय दुर्मिळ रानकुत्र्यांची संख्याही वाढल्याचे दिसून येत आहे.

सह्याद्रीच्या खोऱ्यात त्यांचा वावर प्रामुख्याने दक्षिणेकडील पट्ट्यामध्ये आढळतो, परंतु रानकुत्रे फणसाड अभयारण्यात दिसू लागल्याने प्रशासनाकडून आनंद व्यक्त केला जात आहे. अभयारण्यात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले होते. यात दोन वेळा रानकुत्र्यांचे छायाचित्र टिपण्यात आले होते. शिवाय पाणवठ्यावरही ठसे आढळले आहेत. फणसाडमधील मनोऱ्यावरून निरीक्षण करताना दोन रानकुत्रे आढळून आले. एका कॅमेऱ्याने रानकुत्रा टिपता आला, तर दुसरा पळाल्याची माहिती फणसाड अभयारण्याचे वन परिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांनी दिली आहे.

प्रथमच उत्तर-पश्चिम घाटातही रानकुत्र्यांच्या अधिवासाची नोंद करण्यात आली आहे. फणसाड अभयारण्यातही या प्राण्याचा वावर आढळला आहे. अत्यंत चपळ व वेगवान पळणारे हे प्राणी असून याचा वावर निश्चित कोणत्या ठिकाणी आहे. यांची वस्ती कोणत्या ठिकाणी आहे, याचा शोध घेऊन या प्राण्याचे संवर्धन वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. फणसाडमध्ये रानकुत्र्यांची निश्चित संख्येसाठी मोहीम सुरू आहे.

# दिव्यांग मुलांसमवेत दिगवंत मुलीचा वाढदिवस साजरा

**चौक : प्रतिनिधी**

आपल्या स्वर्गवासी झालेल्या मुलीचा वाढदिवस दिव्यांग मुलांच्या समवेत साजरा करून मुलीच्या आठवणींना उजाळा देऊन दिव्यांग मुलांना व शिक्षक, कर्मचारी यांना भेटवस्तू दिल्या.



ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांची ११ वर्षीय मुलगी स्मरणिका प्रशांत कदम हिचे नुकतेच निधन झाले. स्मरणिका लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होती. तिचा स्वभाव प्रेमळ आणि दानशूर होता. शाळेत व राहात असलेल्या परिसरात दुसऱ्यांना मदत करणे हा तिचा छंदच होता. विशेषतः दिव्यांगांबद्दल तिला खूप सहनभुती होती. नुकतेच तिचे निधन झाले.

स्मरणिकाचा वाढदिवस असल्याने तिच्या कुटुंबीयांनी शुक्रवारी (दि.५) सोफिया या दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन तिच्या आठवणींना उजाळा दिला.

# नांदगाव हायस्कूलची मतदान जागृतीसाठी रॅली

**मुरूड : प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी ठरवले आहे. याच उद्देशाने गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या आदेशानुसार, मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील सहजीवन विद्यामंडळ संचलित श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर येथे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही रॅली खारीक वाडा या गावातून, नांदगाव बाजारपेठेमधून सुळपेठमार्गे पुन्हा शाळेत आणण्यात आली. रॅलीमध्ये सुमारे ४५० विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी दतात्रेय खुळपे, प्रतीक पेडणेकर, सागर राऊत, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर व सर्व शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले.




## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-नेरेपाडा, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीवे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजेः नेरेपाडा, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर. पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| नेरेपाडा | श्री. बबन धोंडू कदम | ४६/० | ०.२०.०० | ५.१२ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: ०४/०४/२०२४**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड** (BA LL.B)
पत्ता- श्री. हरे कृष्णा को. ऑप. सोसा. प्लॉट नं. १२, सेक्टर ५, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
मो. क्र. ९६९९४९९९६३

## निवडक



### दारूची वाहतूक करणारा अटकेत

**मोहोपाडा** : रसायनी पोलीस ठाणे हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास एक जण दुचाकीवर अवैधरित्या गावठी हातभट्टीच्या दारूची खारपाडा ते रसायनी अशी वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली होती. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत कराडे गाव येथे पोलिसांनी सापळा रचून संतोष बाबुराव घरत (रा. खारपाडा, पेण) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून सहा हजारांची गावठी दारू व दुचाकी असा ५६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक पोमन, एएसआय राजेश पाटील, प्रसाद पाटील, एचसी संदीप पाटील, राकेश म्हात्रे, सुधीर मोरे, यशवंत जेमसे यांनी केली.

### रोटरी क्लबतर्फे विविध उपक्रम



**मोहोपाडा** : रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आई बाबा फाउंडेशन व मुस्कान मॅजिक मंत्र यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती केंद्र येथील सभागृहामध्ये दैनंदिन जीवनातील बदल आरोग्य, सतर्कता अशा विविध विषयांवर मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या मध्यामातून वेगवेगळ्या पद्धतीच्या मनोरंजनातून स्वास्थ्य व उत्साह निर्माण व्हावा, या हेतूने सप्तरंग आर्केस्ट्रा, संगीत सदाबहार गीतांच्याद्वारे वातावरण मंत्रमुग्ध केले. या जनजागृती कार्यक्रमांमध्ये रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा अध्यक्ष रेश्मा कुरुप, मुस्कान मॅजिक मंत्राच्या संस्थापिका विद्या चित्ता, योगिता घोडंदे, अशोक कवडे, सुनील कुरूप व आई बाबा फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण नवरे, प्रसाद ओक आदी उपस्थित होते. आई बाबा फाउंडेशनच्या वतीने ओंकार सावंत यांनी विशेष आभार मानले.

### ऐरोलीत सेक्युलर मुव्हमेंटचा मेळावा

**नवी मुंबई :** सेक्युलर मुव्हमेंट, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मेळाव्याचे आयोजन नवी मुंबईत ऐरोली येथील जेतवन बुद्ध विहार, सेक्टर ३, बस डेपोजवळ रविवारी (दि. ७) सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.
या वेळी प्रमुख वक्ते म्हणून राज्य सेक्युलर मूव्हमेंटचे अध्यक्ष गौतमीपुत्र कांबळे हे असणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुव्हमेंटचे कार्याध्यक्ष भरत शेळके, ज्येष्ठ पत्रकार मधू कांबळे, प्रकाश हिवाळे, (अध्यक्ष से.मुंबई) अरविंद निकाळजे, अरुण केदारे, पद्माकर धेनक, संजय सावंत, गौतम सांगळे, ॲड. निषाद जावीर, (अध्यक्ष से. मु. ठाणे) बबन मोरे, (खजिनदार से. मुंबई) प्रा. आनंद बनसोडे, विनोद शिंदे (सेक्रेटरी से. मु.) संजय चंदनशिवे, (सेक्रेटरी से. मु. ठाणे )अरविंद वेठम, प्रा. निलेश किटके, ॲड. बुद्धभूषण राजरत्न, संदेश दोंदे, महेंद्र कोल्हे व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### नामधारी कलिंगडाची बाजारात आवक

**नवी मुंबई** : सध्या कडक्याचा उन्हाळा सुरू आहे. त्यामुळे एपीएमसी फळ मार्केटमध्ये वेगवेगळ्या फळांची आवक होत आहे. त्यात रसदार फळांमध्ये महाराष्ट्रीयन कलिंगडाबरोबर चेन्नईचे नामधारी कलिंगडाचीदेखील प्रचंड आवक होत आहे. नामधारी कलिंगडाला ग्राहकांची चांगली मागणी आहे. बाजारात १० ते १२ रुपये किलोने नामधारी कलिंगड विकले जात आहेत. सध्या रमजान, उन्हाळा सुरू असल्यामुळे महाराष्ट्रीयन कलिंगडबरोबर नामधारी कलिंगडालादेखील चांगली मागणी मिळत असल्याचे भरत माने या कलिंगड व्यापारी यांनी सांगितले. सध्या एमपीएससी बाजारात दररोज १५० ते २०० गाड्या येत आहेत.

# नवी मुंबईत लवकरच कचऱ्याची ई-वाहतूक सुविधा

## कचरा वाहतूक व संकलनासाठी निविदा प्रसिद्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ शहरात नवी मुंबईचा समावेश होत असून महापालिकेने कचरा वर्गीकरणाची व्याप्ती वाढवण्याची तयारी सुरू केली आहे. मागील वर्षभरापासून सातत्याने मुदतवाढ देण्यात येणाऱ्या कचरा वाहतूक व संकलनाची निविदा पालिकेने प्रसिद्ध केली असून पालिकेच्या इतिहासात प्रथमच कचऱ्याची ई-वाहतूक सुविधाही राबवली जाणार आहे. १३ मेपर्यंत निविदा स्वीकारण्याची मुदत देण्यात आली.



आतापर्यंत कचरा वाहतूक व संकलनासाठी वारंवार जुन्याच ठेकेदाराला मुदतवाढ दिली जात होती. त्यातच पालिकेला अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रकल्प अहवाल प्राप्त होण्यासाठी बराच कालावधी लागला होता. त्यामुळे आता पालिकेने या कामाबाबत निविदा काढली असून मागील काम हे २४००रुपये टनाप्रमाणे देण्यात आले होते. त्यामुळे या वेळची निविदा किती कोटीपर्यंत जाणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

यंदा कचरा वर्गीकरणाची व्याप्ती नव्या निविदा प्रक्रियेत वाढवली जाणार आहे. विविध पद्धतीचा कचरा वेगळा करण्याचा पालिकेचा मानस आहे. ओला व सुका कचऱ्याच्या वर्गीकरणाप्रमाणेच घरगुती घातक कचरा वर्गीकरण तसेच प्लास्टिक, लाकूड, काच, धातू अशा कचऱ्याचे वर्गीकरण करून कचरा संकलन केले जाणार आहे, तसेच एकीकडे सर्वत्र इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर सुरू झाला असताना कचरा वाहतुकीसाठीही छोट्या इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर करण्याबाबतही विचार केला जाणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

आगामी कचरा वाहतूक व संकलन निविदा कोट्यवधींच्या घरात जाणार असून शहराला देशात स्वच्छतेबाबत मिळालेला नावलौकिक टिकवण्यासाठी व सातत्याने वाढवण्यासाठी पालिका योग्य ती खबरदारी घेणार असल्याचे चित्र आहे.

> **कचरा वाहतुकीसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून ई-वाहनांचाही वापर होणार आहे. गावठाणांतील कचरा संकलनाला प्राधान्य देण्यात आले आहे.**
> **-डॉ. कैलास शिंदे, आयुक्त**

## चिरनेर येथे नाडी परीक्षणाद्वारे रुग्ण तपासणी शिबिर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

फिलान हर्बो मेडिक्स प्रा. लि.च्या वतीने चिरनेर, कातळपाडा येथे आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. नजम अली कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरात नाडी परीक्षणाद्वारे आजारांचे निदान करून रुग्णांना मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते संदीप लकडे, चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य किशोर भगत व आशावर्कर प्रगती भगत यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात थायरॉईड, मुतखडा, मुळव्याध, मधुमेह, कावीळ ,दमा, सर्दी, खोकला, सांधेदुखी, गुडघे दुखी, वातरोग, चर्मरोग, पोट वाढणे, स्त्रियांचे आजार, शोचास साफ न होणे, भूक न लागणे, अपचन, केस गळणे, डोकेदुखी, दंत विकार, अल्सर, गॅस, पित्त, जळजळ, अशक्तपणा, वजन वाढविणे, वजन कमी होणे आदी रोगांची तपासणी ही नाडी परीक्षणाद्वारे करण्यात आली.



या वेळी स्त्रियांच्या आरोग्याविषयी माहिती आणि व्यंधत्वाविषयी तपासणी करण्यात आली, तसेच त्यावरील उपाययोजनांबाबत डॉ. कादरी यांनी मार्गदर्शन केले. नाडी परीक्षणाद्वारे उपचार पद्धतीच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करणारे डॉ. नजम अली कादरी हे महाराष्ट्रातील पहिले, भारतातील दुसरे तर जगातील बाविसावे आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी आहेत. सध्या उरण तालुक्यात त्यांचा दौरा सुरू असून आत्तापर्यंत तालुक्यात २० शिबिरे घेण्यात आली असल्याचे त्यांचे सहकारी संदीप लकडे यांनी सांगितले.

## द्रोणागिरी हायस्कूलमध्ये विविध उपक्रमांचा शुभारंभ

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूल येथे विद्यालयाचे नामफलकाचे अनावरण व पाण्याच्या टाकीची दुरूस्ती करण्यात आली त्याचे उद्घाटन गुरुवारी (दि.४) करण्यात आले.

विद्यालयाच्या पाण्याच्या टाकीला गळती लागली होती. झाडांची मुळे टाकीत शिरल्यामुळे पाणी टाकीत राहात नव्हते. विद्यालयात १००० ते ११०० विद्यार्थी शिक्षण घेत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. काही वेळा शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी बाहेरून पाणी आणावे लागत होते. याबाबत मराठी माध्यमाच्या एसएससी बॅच १९८१चे माजी विद्यार्थी सरस्वती कोळी, चंद्रकांत कोळी, वासूदेव कोळी व त्यांचे सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन ५१ हजार रुपयांची मदत केली. करंजा सोसायटी नवापाडा ग्रामस्थ मंडळ, बळीराम मसण, शाळेचा शिक्षक वर्ग यांनीही आर्थिक मदत केली. त्या मदतीतून पाण्याची टाकी दुरूस्ती करून विद्यालयाच्या गेटसमोरच भिंतीवर सुंदर व सुबक नामफलक बनविले.

या वेळी माजी विद्यार्थी, चाणजे सरपंच अजय म्हात्रे, विद्यालयाचे चेअरमन सिताराम नाखवा, व्हा. चेअरमन के.एल. कोळी, मुख्याध्यापिका सुरेखा म्हात्रे, सोसायटीचे माजी चेअरमन शिवदास नाखवा, भालचंद्र कोळी व शिक्षक उपस्थित होते.




## स्वच्छता मोहिमेत एक टन कचरा गोळा



**नवी मुंबई : बातमीदार**

एन्व्हायर्नमेंट लाइफ फाउंडेशनतर्फे दर आठवड्याला कांदळवन क्षेत्रात स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. यंदा १८९वी मोहीम पार पडली. एका दिवसात एक टन कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेत ६० मॅन्ग्रोव्ह सोल्जर्सतर्फे नवी मुंबईतील करावे जेट्टीजवळ ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

शहराची सुरक्षा कांदळवने करत असतात. नवी मुंबईला खाडीकिनारा लाभलेला असून त्याभोवती कांदळवने आहेत, मात्र या कांदळवनात सातत्याने खाडीतून इतर शहरातून वाहून आलेला कचरा अडकलेला दिसून येतो. ठाणे, मुंबई, उरण येथून हा कचरा येत असल्याचे आढळून आले आहे. ही बाब ओळखत धर्मेश बराई व त्यांचे सहकारी हे कायम स्वच्छता मोहीम राबवत आले आहेत. त्यातूनच नुकत्याच झालेल्या स्वच्छता मोहिमेत एक टन कचरा गोळा करण्यात आला.

या मोहिमेत क्रिकेट अंपायर असोसिएशनचे सदस्य सहभागी झाले होते. क्रिकेट अंपायर असोसिएशनचे सचिव नावीद इब्राहिम आणि इनव्हींल एनएम संगिनी सेंच्युरियनचे उपाध्यक्ष अजित कौर यांसह ६० जण उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात इंग्लिश व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य, रॅली तसेच विविध स्पर्धा घेऊन मतदान जनजागृती केली.

शिक्षणाधिकारी नवी मुंबई महापालिका यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांकरिता जागा हो मतदार या विषयांतर्गत जनजागृती करणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी व मराठी विभागाच्या आणि ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि गीतगायन स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बँड पथकास सोबत घेऊन विविध घोषणा देत पथनाट्य व रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी तुमचे मत तुमचा अधिकार, मतदान राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, नवे वारे नवे दिशा मतदानच आहे उद्याची आशा, चला मतदान करू या लोकशाही रुजवूया अशा घोषणा दिल्या.

संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, समन्वयक पांडुरंग मुळीक, ज्येष्ठ शिक्षिका राजकुमारी इंदलकर, जगन्नाथ कोळी, रमेश राऊत, कविता तेंडुलकर यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.




## रंगीबेरंगी माठांना बाजारपेठेत मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत**

सध्या उन्हाचा तडाखा वाढल्याने फ्रीजपेक्षा मातीच्या माठातील थंडगार पाण्याला अनेकजण पसंती देत आहेत. त्यामुळे मातीच्या माठांची मागणी वाढली आहे. परिणामी, माठ बनविणाऱ्या कारागीर, विक्रेते व व्यावसायिकांना सुगीचे दिवस आले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा किमती ३० ते ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत.

उन्हाचा पारा हा दिवसेंदिवस वाढत असल्याने शरीरातील पाणी कमी होऊन तहान लागून घसा कोरडा पडतो. तहान भागविण्यासाठी थंडगार पाणी पिणे हा एकमेव उत्तम पर्याय असतो. मातीच्या माठातील थंडगार पाणी पिणे हे शरीरासाठी उपयुक्त ठरते. फ्रीजमधील थंड पाणी पिण्यास काही जण पसंती देतात. तर काही शीतपेय पिण्यास पसंती देतात, मात्र उन्हाळ्यात माठातील पाणी पिणे हे आरोग्यास हितकारक ठरते. त्यामुळे मातीच्या मडक्यांची मागणी ही दिवसेंदिवस वाढत आहे.



> **विविध प्रकारची चित्रे**
> लाल, काळी आणि पांढऱ्या रंगाची मडकी सध्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्यापैकी पांढऱ्या रंगाच्या मातीच्या मडक्यांवर विविध रंगांनी चित्रे साकारल्याने आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

पनवेलमधील मार्केट परिसरात राजस्थान, अहमदाबाद आणि बंगळूर येथून मातीची मडकी विक्रीसाठी दाखल झाली आहेत.

पनवेल मार्केट परिसरात वसीम देवरिया गेल्या ५० वर्षांपासून मातीची मडकी विकण्याचे काम करीत आहेत. ही मडकी बंगळूर आणि कच्छ येथून दाखल होत असून त्यांची किंमत ४०० ते ५०० रुपये इतकी असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. लाल आणि काळ्या रंगाच्या मडक्यांची मागणी ग्राहक अधिक करत आहेत. त्यांची किंमत २५० ते ६०० रुपये इतकी आहेत. लहान-मोठ्या आकारातील असून काहींना नळ बसवले आहेत. त्यानुसार त्यांच्या किमती आहेत. माती आणि कारागिरांचे दर तसेच वाहतूक महागल्याने मडक्यांच्या किमती ४० टक्क्यांनी वाढल्याची वसीम देवरिया यांनी दिली.

## खारघर मनःशक्ती केंद्रात उन्हाळी मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वार्षिक परीक्षासंपल्यावर विद्यार्थी-विद्यार्थिनींना उन्हाळी मार्गदर्शन शिबिरांचे वेध लागतात. खारघर सेक्टर ५मधील मनःशक्ती प्रयोग केंद्रातर्फे ५ ते २१ वयोगटातील मुलेमुलींसाठी उन्हाळी मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहे.

या शिबिरात बाल संस्कार वर्ग, मानस चाचण्या, अभ्यास यश पध्दती, चांगल्या सवयी आणि नेतृत्वगुण आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिरामध्ये ५ ते २१ वयोगटातील मुले-मुलींना मोफत प्रवेश दिला जाणार आहे. एप्रिल महिन्यात दर रविवारी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत बालसंस्कार वर्ग घेण्यात येणार आहे तसेच प्रत्येक शनिवारी आणि रविवारी समुपदेशन केले जाणार आहे. १५ ते २८ एप्रिलदरम्यान ५ ते २१ वयोगटासाठी उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

## मतदार जनजागृती प्रभातफेरीला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

सार्वत्रिक लोकसभा २०२४च्या निवडणुकीचे वारे सध्या वाहत असून मतदान प्रक्रिया अवघ्या काही दिवसांवर आली आहे. प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी शहरातील शाळा, विद्यार्थी जनजागृती करत असून मतदानाचे महत्त्व नागरिकांना पटवून देत आहेत.

या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत मंगळवारी दिवाळे कोळीवाड्यातील नवी मुंबई महापालिका शाळा क्र. ११७, दिवाळे यांनी मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रभातफेरी काढली.

या वेळी, घटनेने देशाच्या नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून आपण ते बजावलेच पाहिजे, या विचाराचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी 'मतदार राजा जागा हो... लोकशाहीचा धागा हो... 'वोट देने जाना है... देश को आगे बढ़ाना है..., आपल्या मताचे दान आहे, लोकशाहीची शान' अशा घोषणा देत मतदानाचे महत्त्व पटवून दिले. नागरिक, व्यावसायिक, या मतदारांमध्ये जनजागृती केली.

दरम्यान, मतदार नोंदणी आणि दुरूस्तीसंदर्भात नागरिकांची अनास्था आणि घरापर्यंत येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याबाबत येथील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करीत मतदानाचे महत्त्व लोकांना पटवून दिले. हा उपक्रम नवी मुंबई परिसरात चर्चेचा विषय ठरला.

या जनजागृतीच्या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा कुदळे व सर्व शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.



# मतदान यंत्रांची प्रथम सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३२ रायगड आणि ३३ मावळ लोकसभा मतदारसंघातील सात विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्रानुसार ईव्हीएम व्हीव्हीपॅट यंत्राची प्रथम सरमिसळ शुक्रवारी (दि.५) जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली. ही प्रथमस्तरीय सरमिसळ प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किशन जावळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर खुटवड तसेच इतर वरिष्ठ अधिकारी आणि राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली ऑनलाईन पद्धतीन ही सरमिसळ करण्यात आली. रायगड जिल्ह्यातील मतदार संख्येच्या प्रमाणानुसार दोन हजार ७१९ मतदान केंद्र आहेत. सध्या जिल्ह्यासाठी सहा हजार ७८० बॅलेट युनिट, तीन हजार ७७४ कंट्रोल युनिट, तर तीन हजार ९५२ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत. सर्व विधानसभा मतदारसंघांत मतदान केंद्राच्या १३८ टक्के बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १४५ टक्के व्हीव्हीपॅट वाटप करण्यात येणार आहेत.

प्रत्येक मतदारसंघनिहाय मतदान यंत्र, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट मशिन देण्यात येणार आहे. सध्या ही यंत्रे जिल्हास्तरावर स्ट्राँगरूममध्ये आहेत.

# पोलादपूरमध्ये पाणीटंचाई

## विविध उपाययोजनांद्वारे निवारणाचे प्रयत्न

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यात पाणीटंचाई निवारण कृती आराखडा पंचायत समिती आणि तहसिलदार कार्यालयाच्या दुहेरी नियंत्रणाखाली आखण्यात आला असून यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासह सार्वजनिक विहिरीतील गाळउपसा, विंधन विहिरींची दुरूस्ती, विहिरी तयार करणे आदी कामांचा उल्लेख दिसून येत आहे.

तालुक्यातील सावित्री, ढवळी, कामथी, चोळई आणि घोडवनी या पाच प्रमुख नद्यांच्या पाण्यांचे डोह वगळता सर्व पात्रांमध्ये पाण्याचा खडखडाट दिसून येत आहे. या नदीपात्रांमध्ये पाणी अडविण्यासाठी रेती काढण्याचे अभियान सुरू असले तरी या अभियानानंतर पात्रामध्ये रेतीचा साठा होत असतो.

तालुक्यातील नावाळे, खडपी, चोळई, वावे, घागरकोंड, फौजदारवाडी, बोरघर, चांदले, सडवली, चांदके, सडे, धारवली, बोरज, देवळे, माटवण, कोतवाल खुर्द, गांजवणे, चरई, करंजे, पार्ले, दिविल, आडावळे बुद्रुक, सवाद, मोरगिरी, वडघर, हळदुळे, देवपूर, खांडज, खोपड, लोहारे, कोंढवी, तुर्भे बुद्रुक, भोगाव बुद्रुक, निवे, ढवळे, केवनाळे, क्षेत्रपाळ, महाळुंगे, साळवीकोंड, कातळी, नाणेघोळ, कापडे बुद्रुक, रानवडी, गोवेले, ओंबळी, ताम्हाणे, कापडे खुर्द, महालगूर, परसुले, चिखली, गोलदरा, आडावळे, चांभारगणी बुद्रुक, फणसकोंड, कणगुले आदी ५७ नळपाणी पुरवठा योजनांचे काम २२ ठेकेदारांमार्फत सुरू असून ५३ कोटी रुपयांची तरतूद जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेली आहे.

यंदाच्या पाणीटंचाई निवारण कृती आराखड्यामध्ये एक कोटी ४० लाख खर्चाच्या २५ गावे आणि ४४ वाड्यांमध्ये ६९ सार्वजनिक विहिरीतील गाळ उपसा करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यातील प्रत्येक कामासाठी दोन लाख रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आल्याचे आराखड्यामध्ये नमूद करण्यात आले आहे.

बैलगाडी अथवा टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी ३८ गावे व ७४ वाड्या अशा एकूण ११२ ठिकाणच्या २८ लाख रुपये खर्चाच्या उपायांचा पाणीटंचाई निवारण कृती आराखड्यात समावेश करण्यात आला. १ एप्रिलपासून कालवलीतील पवारवाडी, पाटीलवाडी, भोसलेवाडी, विठ्ठलवाडी, बौद्धवाडी, मोहल्ला या सहा वाड्या; चांभारगणी, आड, किनेश्वरमधील किनेश्वरवाडी, किनेश्वर पेढेवाडी, किनेश्वर पेठवाडी या तीन वाड्या; ताम्हाणे, निवे, वडघरमधील सणसपेढा, पाटीलवाडी, फौजदारवाडी, उलालकरवाडी, कामथे फौजदारवाडी, जांभाडी आणि बोरघर बौद्धवाडी, बाळमाची, मोरसडे येथील गवळयाचा कोंड, शिंदवाडी, भोसारवाडी या तीन वाड्या; तुटवली गावासह गलतीचीवाडी, धनगरवाडी, परसुले धनगरवाडी, क्षेत्रपाळ गावांसह आमलेवाडी, धनगरवाडी, कुडपण खुर्द, कोतवाल गावासह कोतवाल सकपाळवाडी कोतवाल धनगरवाडी, आडावळे बु. एरंडवाडी, मोरसडे आडाचा कोंड, सडेकोंड, नावाळे गाव, कापडे खुर्द कोसंबवाडी, कुंभळवणे, कापडे खुर्द, कातळी बंगला गावासह कातळी बागवाडी, ओंबळी पेढा, तामसडे, मोरगिरी धनगरवाडी, कोतवाल खुर्द गावासह बेलाची वाडी, रेववाडी, बागवाडी, दाभाडधनगरवाडीत टँकरद्वारे पाणी पुरवले जाणार आहे.

# ‘जेएसएस’चे कार्य कौतुकास्पद –राम नाईक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जनशिक्षण संस्थानच्या सहाण येथील प्रशिक्षण केंद्राला उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक व त्यांच्या सहकारी सदस्यांनी गुरुवारी (दि.४) भेट दिली. जेएसएसचे पर्यावरणपूरक प्रशिक्षण केंद्र आत्मनिर्भर भारतचे एक उत्तम उदाहरण आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. जेएसएसच्या २० वर्षांच्या कार्याचा सक्रिय आढावा घेऊन कौतुकाची थाप त्यांनी दिली.



माजी राज्यपाल राम नाईक यांची सदिच्छा भेट जेएसएसच्या कार्याला नवीन चेतना प्रेरणा व ऊर्जा देईल, असे उद्‍गार या वेळी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या व अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी व्यक्त केले. संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून संस्था प्रगती अहवाल व पर्यावरणपूरक केंद्र माहिती सादरीकरण करण्यात आली.

कौशल्य विकास योजनेंतर्गत सदिच्छा भेटीवेळी पीएमयु कार्यालय वरिष्ठ अधिकारी प्रभास मिश्रा, सहाय्यक शरद वाझे, प्रसन्न कुडतळकर, जेएसएसच्या उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, बोर्ड मेंबर सीमा विशे, दत्तात्रेय नाईक, नरेन जाधव, संजय राऊत यांच्यासमवेत अकाउंट ऑफिसर प्रतीक्षा चव्हाण, प्रशिक्षक रूपाली माळवी, वृषाली भागवत, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, वेदांती पाटील व कार्मचारी उपस्थित होते.

# म्हसळ्यात उघडी गटारे सर्वांसाठी ठरताहेत अडचणीची

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा नगरपंचायत हद्दीतील उघडी गटारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक, शाळकरी विद्यार्थी यांना अडचणीची ठरत आहेत. कन्याशाळा परिसरातील गटारात एक गाय पडून दुर्घटना झाल्याची घटना नुकतीच घडलेली आहे.

म्हसळा शहरासह सावर, आदिवासी वाडी, दुर्गवाडी , चिराठी, गवळवाडी,नवानगर, बेलदारवस्ती या शहराच्या उपनगरातून गटारे-रस्ते यासाठी कामे, तर रस्त्यालगत होणारी इमारत बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे कधी रस्ता अरूंद होणे, रस्त्यालगत मातीचे ढिगारे असणे असे होत असल्याचे चित्र असताना उघडी गटारे सर्वांनाच त्रासदायक ठरत आहेत. अशातच एका गटारात पडून गायीचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर उघडी गटारे झाकण्याची उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.



# कोलमांडला येथील अतिक्रमण भरावाची शासकीय पाहणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोलमांडला येथे कांदळवन तोड करून करण्यात आलेल्या अतिक्रमण भरावाची तसेच कांदळवन तोडबाबत शासकीय तपासणी नुकतीच करण्यात आली. कोलमांडला येथील रहिवासी प्रतिक कणगी यांनी मॅग्रोह सुरक्षा या संकेतस्थळांवर केलेल्या तक्रार निवेदन अर्जाची दखल घेण्यात आली.



मॅग्रोव्ह सुरक्षा संकेतस्थळावर कोलमांडला रहिवासी प्रतिक कणगी यांनी १९ मार्च २०२४ रोजी तक्रार निवेदन अर्ज दिला होता. यामध्ये मुरूड तालुक्यातील कोलमांडला गट क्रमांक ५४ येथे शासकीय राखीव वन जमिनीत अनधिकृतपणे भराव करण्यात आला आहे. वारंवार सूचना व तक्रारी देऊनही फक्त अनधिकृत कामास तात्पुरती स्थगिती देण्यात आली, मात्र अद्याप कांदळवन भराव हटविण्यात आला नाही. या प्रकाराने भविष्यात पुन्हा अतिक्रमित जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या भरावाखाली कांदळवन वृक्ष दबले असून तेथील भराव हटवून या ठिकाणी नवीन कांदळवन वृक्षाची पुनर्लागवड करावी, अशी मागणी केली होती.

या प्रकरणाची तपासणी करण्याचे उपविभागीय अधिकारी यांना सूचित करण्यात आले होते व कोलमांडला स्थळ पाहणी करून कांदळवन तोड झाल्याचे कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, असे म्हटले आहे.

त्यानुसार कोलमांडला सयुंक्त स्थळ पाहणी करण्यात आली. सन २००५पासूनचे गुगल ई-मेल, एमआरएसएसीकडील नकाशाचे अवलोकन करून तसेच वस्तुस्थितीबाबतचे फोटोग्राफ सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रित स्वाक्षरीचा अहवाल अलिबाग व मुरूड तालुका स्तरावर गठीत केलेल्या समितीचे सचिव तसेच परिक्षेत्र वनअधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात सादर करण्यात येणार आहे.

या वेळी फणसाड वनरक्षक, मुरूडचे गटविकास अधिकारी, कांदळवन कक्ष अधिकारी, मंडळ अधिकारी, कोलमांडला तलाठी, बोर्ली ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

# खोपोली हद्दीत स्वच्छतेचा बोजवारा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेकडून स्वच्छता सर्वेक्षण अभियान अंतर्गत सर्वत्र भिंती रंगवून स्वच्छतेचा संदेश दिला गेला आहे, मात्र शहरातील खरी स्वच्छता वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे.

नगरपालिका क्षेत्रातील बहुसंख्य गटारे, नैसर्गिक नाले सदैव कचरा व गवताने तुडुंब भरले असून सांडपाणी निचरा होत नसल्याने डास व मच्छरांनी नागरिक हैराण आहेत. असे असताना पालिका स्वच्छता विभागातील कामगार प्रत्यक्षात दोन तासही काम करीत नसल्याचे चित्र आहे.

दरम्यान, टप्याटप्याने गटारे व नालेसफाईची कामे होत आहेत. यासाठी विशेष पथक बनविण्यात आले असून वरिष्ठ अधिकारी याकामी नेमण्यात आले आहेत, असे मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी सांगितले.

# श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे बॅरिगेट्स टवाळ पोरांनी फेकले नाल्यात

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील शासकीय विश्रामगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या एका मोरीवरून काही टवाळ पोरांनी पोलिसांचे बॅरिगेट्स नाल्यात टाकून दिले आहे.

श्रीवर्धन पोलीस ठाण्याला डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे अनेक बॅरिगेट्स देणगी स्वरूपात देण्यात आलेले आहेत. शहरात कोणत्याही राजकीय नेत्यांचा कार्यक्रम असेल किंवा बंदोबस्त असेल तर या बॅरिगेटस्चा उपयोग केला जातो. समुद्रकिनाऱ्यावर अनेक वेळा पर्यटकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी उसळते. त्या वेळीदेखील पोलिसांना बॅरिगेट्स लावण्याची वेळ येते.



काही टवाळखोरांनी पोलिसांचे बेरिगेट्स त्या ठिकाणी असलेल्या नाल्यामध्ये टाकून दिले आहे. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याकडे जाणाऱ्या मार्गावर व समुद्र किनाऱ्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत. त्यामुळे हे बॅरिगेट्स कोणी टाकले याबाबत पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज चेक करून तपास करावा व कारवाई करावी.

# महाड पालिका हद्दीत खड्डे भरण्याचे काम मंदावले

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे, रस्त्यांचे जोड आणि विविध कारणांसाठी खोदलेले रस्ते यामुळे वाहन चालवताना चालकांना त्रास होत आहे, मात्र खड्डे भरण्यास सुरुवात केली असताना काही ठिकाणी खड्डे भरून हे काम थांबवलेले आहे. या मंदावलेल्या कामामुळे वाहनांचे मात्र नुकसान होत आहे.

महाड शहरामध्ये असलेले बहुतेक रस्ते हे काँक्रीटचे झालेले आहेत. हे रस्ते जवळपास १० वर्षांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्यांवर आता तसेच एक ठिकाणी विकासकामे करीत असताना खोदकाम झालेले आहे नागरिकांनीदेखील पाण्याच्या जोडणीसाठी खोदकाम केले आहे. काँक्रीट रस्त्यांचे जोड आणि पडलेले खड्डे यामुळे वाहनचालकांचे मात्र हाल होत आहे. शहरातील एसटी बसस्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दस्तुरी नाका दस्तुरी नाका येथून नातेखिंडीकडे जाणारा, रस्ता गांधारी पुलाकडे जाणारा रस्ता, त्याचप्रमाणे सावित्री मार्ग, वीरेश्वर मंदिर परिसर आणि इतर गल्लोगल्ली असलेल्या रस्त्यांवर ही अवस्था दिसून येत आहे.



यापूर्वीदेखील या रस्त्यांवर अशीच अवस्था होती, मात्र महाड नगरपालिका कायम जर्मन टेक्नॉलॉजी वापरत काँक्रीट रस्त्यावर डांबरी पॅच मारते. या वेळीदेखील असेच तंत्रज्ञान वापरून काँक्रीट रस्त्यांवर डांबर टाकून खड्डे भरण्याची निविदा काढली. वीरेश्वर मंदिर ते आयटीआय या परिसरात खड्डे भरण्याचे काम झाले. शिवाय छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर देखील खड्डे भरले, गेले मात्र हे खड्डे भरत असताना खड्ड्यांपेक्षा उंचवटे जास्त झाले. या उंचावट्यांमुळे ठिकठिकाणी गतिरोधक निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत तक्रारी झाल्यानंतर हे काम थांबवण्यात आल्याचे समजले. या मंदावलेल्या कामामुळे वाहनांचे मात्र नुकसान होत आहे.

# दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे एमएच ०६ सीएन दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू करण्यात आली आहे. ज्यांना खासगी चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क (तीनपट शुल्क) भरून हवे असतील त्यांनी कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या परिवहन विभागात डीडी, पत्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी केले आहे.

एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. त्या अर्जदारांनी ८ एप्रिल रोजी दुपारी २.३०पूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रकमेचा डीडी बंद लिफाफ्यामध्ये घालून कार्यालयात जमा करावा. अतिरीक्त धनाकर्षण कमीत कमी ३०१ रुपयांचा असावा. त्यापेक्षा कमी रकमेच्या धनाकर्षणचा विचार केला जाणार नाही. या अर्जासाठी त्याच दिवशी सायंकाळी ४ वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

ज्या दुचाकी वाहनांना चारचाकी वाहनाच्या नोंदणी क्रमांकासाठी आलेल्या अर्जाचे नोंदणी क्रमांक वगळून पसंतीचे क्रमांक विहित शुल्क (तीनपट शुल्क) भरून हवे असतील त्यांनी ८ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते दुपारी २.३० दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या परिवहन विभागात जमा करावेत. एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी १० एप्रिल रोजी कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार अर्जदारांनी १० एप्रिल रोजी दुपारी २.३०पूर्वी जास्तीच्या रकमेचा डीडी बंद लिफाफ्यामध्ये घालून कार्यालयात जमा करावा. अतिरिक्त धनाकर्षण कमीत कमी ३०१ रुपयांचा असावा. त्यापेक्षा कमी रकमेच्या धनाकर्षणाचा विचार केला जाणार नाही. अर्जासाठी त्याच दिवशी सायंकाळी ४ वा. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

डीडी Dy. RTO, PEN यांच्या नावे नॅशनलाईज्ड, शेड्युल्ड बँकेचा असावा तसेच तो दोन महिन्यांपेक्षा जास्त जुना नसावा. अर्जदाराने अर्जासोबत पॅनकार्ड व आधारकार्ड साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा डीडी या सीलबंद पाकिटात जमा करावा. आकर्षक क्रमांकासाठी आलेल्या अर्जासोबत असणारे धनाकर्षण अर्ज स्वीकारणाऱ्या दिवासापासून दोन महिन्यांपेक्षा जुने असलेले धनाकर्षणाचे अर्ज बाद केले जातील तसेच विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे असलेले डीडीसुद्धा बाद केले जातील.

आकर्षक क्रमांकासाठी आगाऊ स्वरूपात अर्ज स्वीकारत असून चालू मालिका संपल्याशिवाय नवीन मालिका सुरू होणार नाही व आगाऊ प्रक्रियेत स्वीकारलेल्या अर्जाच्या धनाकर्षणच्या पावत्या, जुन्या मालिकेतील पूर्ण नंबर संपल्याशिवाय फाडल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

# पंजाबची गुजरातवर शानदार मात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

शशांक सिंहच्या ६२ धावांच्या विस्फोटक खेळीच्या जोरावर पंजाब किंग्सने आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्स संघावर शानदार विजय मिळवला. इम्पॅक्ट प्लेअर आशुतोष शर्मा आणि शशांक सिंह यांनी डेथ ओव्हर्समध्ये वादळी फलंदाजी करीत संघाला तीन विकेट्सने विजय मिळवून दिला.



गुजरातने दिलेल्या २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब संघाची सुरुवात खराब झाली. कर्णधार शिखर धवन काही विशेष करू शकला नाही आणि एक धाव करून पॅव्हेलियनमध्ये परतला. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात पंजाब किंग्जने दुसरी विकेट गमावली. जॉनी बेअरस्टो १३ चेंडूंत २२ धावा करून बाद झाला. मग प्रभसिमरन सिंग (२४ चेंडूंत ३५ धावा) आणि सॅम करन (पाच चेंडूंत आठ धावा) हेही परतले. सिकंदर रझा आणि शंशाक सिंग यांनी पाचव्या विकेटसाठी चांगली भागीदारी रचत होते, पण मोहित शर्माने सिकंदर रझाला बाद केले. रझाने १६ चेंडूंत १५ धावा केल्या. पंजाब किंग्जने १५० धावांवर आपली सहावी विकेट गमावली. यष्टिरक्षक जितेश शर्माने आठ चेंडूंत दोन षटकारांच्या मदतीने १६ धावा केल्या, पण तो मैदानात फार काळ टिकू शकला नाही.

### शशांक सिंहची वादळी खेळी; आशुतोष शर्माचीही चमक

दरम्यान, शशांक सिंग आणि इम्पॅक्ट खेळाडू आशुतोष शर्मा यांच्यामध्ये सातव्या विकेटसाठी २२ चेंडूंत ४३ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे सामन्याला एक वेगळे वळण मिळाले. आशुतोष शेवटच्या षटकात झेलबाद झाला. त्याने १७ चेंडूंत ३१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. आशुतोष बाद झाल्यानंतर शशांक संघाला विजय मिळवून देत माघारी परतला.

तत्पूर्वी पंजाब किंग्स संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरातने २० षटकांत १९९ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलने ४८ चेंडूंत ८९ धावांची खेळी केली. फलंदाजीने सुरुवात करताना साहा आणि गिलने पहिल्या विकेटसाठी २९ धावांची भागीदारी केली. साहा ११ धावा करीत बाद झाला. केन विल्यमसनने गिलला चांगली साथ देत २६ धावा केल्या, पण तोही मोठी खेळी न करता झेलबाद झाला. विजय शंकरलाही रबाडाने तंबूत धाडले. त्यानंतर आलेल्या राहुल तेवतियाने आठ चेंडूंत २३ धावांची वादळी खेळी करीत गिलसोबत संघाचा डाव १९९पर्यंत नेला. पंजाबकडून कागिसो रबाडाने दोन विकेट्स मिळवल्या. त्याच्याशिवाय हरप्रीत ब्रार आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत रोह्याच्या श्रेयस पराडकरची 'सुवर्ण' हॅट्ट्रिक

**नागोठणे : बातमीदार**

रोहे शहरातील रहिवासी तसेच कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहंदळे हायस्कूलचा विद्यार्थी श्रेयस दीपक पराडकर याने कर्नाटकातील मंड्या येथे आयोजित राष्ट्रीय जलतरण अजिंक्यपद स्पेशल ऑलिम्पिक स्पर्धेत तीन सुवर्णपदके पटकावली आहेत.



या राष्ट्रीय स्तरावरील जलतरण अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १३ राज्यांतील स्पर्धकांचा सहभाग होता. स्पर्धेत श्रेयस याने ५० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर बटरफ्लाय आणि २५X४ मीटर फ्रीस्टाईल रिलेमध्ये सुवर्णपदक जिंकले.

याआधीही नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत श्रेयसने दोन सुवर्णपदके मिळवून महाराष्ट्र राज्यातर्फे राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र होण्याचा मान मिळवला होता.

श्रेयसच्या या कौतुकास्पद यशामागे त्याचे पालक, जे.एम. राठी जलतरण तलाव मार्गदर्शक भूषण शिर्के, मेहेंदळे हायस्कूलचा शिक्षकवर्ग, मुख्याध्यापक रमेश मोसे, मित्र परिवार आणि स्पेशल भारत ऑलिम्पिकचे मार्गदर्शक व शुभचिंतक या सर्वांचा महत्त्वाचा सहभाग आहे. श्रेयसचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# अॅथलेटिक्स चॅम्पियनशीपमध्ये घनःश्याम म्हशीलकर यांनी जिंकली चार सुवर्णपदके

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नॅशनल अर्बन गेम्स् फेडरेशन ऑफ इंडिया अॅथलेटिक्स् चॅम्पियनशीप गोवा येथे पार पडली. या स्पर्धेत ५० वर्षावरील गटात खालापूर तालुक्यातील रिस-कांबे गावचे रहिवासी घनःश्याम श्रीकृष्ण म्हशीलकर यांनी रिलायन्स इंडस्ट्रीज पाताळगंगा कंपनीकडून महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करून चार सुवर्णपदके पटकावली.

म्हशीलकर यांनी १०० मीटर धावणे, लांब उडी, तिहेरी उडी आणि थाळी फेकमध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक जिंकण्याचा मान मिळवला. यासोबत त्यांनी रायगडसह महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे. याअगोदरही त्यांनी रिलायन्स इंडस्ट्रीजचे प्रतिनिधीत्व करीत विविध पदके मिळवली आहेत. या कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.




# सूर्या मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात परतणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा विस्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादव लवकरच संघात परतणार आहे. एमआयने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करून हे संकेत दिले आहेत. मुंबई इंडियन्सचा पुढील सामना रविवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणार आहे. या सामन्यात सूर्यकुमार खेळताना दिसण्याची शक्यता आहे. सूर्या दुखापतीमुळे या हंगामातील सुरुवातीचे काही सामने खेळू शकलेला नाही. त्याचसोबत संघाची कामगिरीही निराशाजनक राहिली आहे. एमआयला आतापर्यंत खेळलेल्या तीन सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे.

### फ्रँचायजीकडून व्हिडीओ शेअर करीत घोषणा




मुंबई इंडियन्सने त्यांच्या सोशल मिडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये एमआयच्या खेळाडूंना विचारले जातेय की कोण येत आहे, त्यावर ते एकेक जण उत्तर दिसताना आहे. दादा, सुपला शॉट, मिस्टर ३६०, अक्षय कुमार यादव अशी एकेकाने उत्तर दिल्यानंतर सूर्याचे काही फोटो दाखवण्यात आले. ही सगळी विशेषणे सूर्या आणि त्याच्या फटकेबाजीसाठी वापरली जातात. आता या व्हिडीओनंतर सूर्या लवकरच संघात दाखल होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### चार महिन्यांनी पुनरागमन

सूर्यकुमार यादव डिसेंबर २०२३पासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. याआधी त्याच्या घोट्याच्या दुखापतीवर उपचार सुरू होते. त्यानंतर त्याच्यावर स्पोर्ट्स हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. सुमारे चार महिन्यांनी सूर्या मैदानावर परतणार आहे. आयपीएलसोबतच सूर्याचे पुनरागमन भारतीय संघासाठीही महत्त्वाचे ठरणार आहे. आयपीएलनंतर टी-२० विश्वचषक खेळवला जाईल, ज्यामध्येही सूर्याची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

सूर्याच्या पुनरागमनामुळे मुंबई इंडियन्सची फलंदाजी अधिक मजबूत होईल. एमआयची मधली फळी अजूनही अननुभवी आहे. सूर्याच्या एण्ट्रीमुळे मधल्या फळीला अधिक बळ मिळेल. सूर्यकुमार यादने आतापर्यंत खेळलेल्या १३९ सामन्यांमध्ये ३२.१७च्या सरासरीने आणि १४३.३२च्या स्ट्राइक रेटने ३२४९ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने २१ अर्धशतके आणि एक शतक झळकावले आहे. सूर्यकुमार यादवची आयपीएलमधील सर्वोच्च धावसंख्या नाबाद १०३* धावा आहे. आयपीएल २०२३मध्ये सूर्याची कामगिरी जबरदस्त होती. गेल्या मोसमात त्याने ४३.२१च्या सरासरीने आणि १८१.१४च्या उत्कृष्ट स्ट्राईक रेटने ६०५ धावा केल्या. गेल्या मोसमात सूर्याने पाच अर्धशतके आणि एक शतक झळकावले होते.

# दिलीप करंगुटकर स्मृती शालेय कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अॅकॅडमीतर्फे क्रीडा सल्लागार स्व. दिलीप करंगुटकर यांच्या तृतीय स्मृती दिनानिमित्त ६ एप्रिल रोजी भायखळा येथे होणाऱ्या विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धेत मुंबईसह विविध जिल्ह्यातील उदयोन्मुख ३८ खेळाडूंमध्ये विजेतेपद पटकाविण्यासाठी चुरस होणार आहे.

१५ वर्षाखालील शालेय मुला-मुलींच्या एकेरी कॅरम स्पर्धेतील पहिल्या आठ विजेत्यांना आकर्षक चषक-पदक व स्ट्रायकर देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन क्रीडाप्रेमी राजेश सुर्वे यांच्या, तर बक्षीस समारंभ डॉ. विशाल मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे परिसर व अविनाश स्पोर्ट्स यांचे स्पर्धेला सहकार्य लाभले आहे. क्रीडा व सामाजिक सेवाभावी कार्यकर्ते स्व. दिलीप करंगुटकर स्मृती चषक पटकाविण्यासाठी आर्यन स्कूल-पुणेचा आयुष गरुड, पार्ले टिळक विद्यालयाचा सार्थक केरकर, इझाक न्यूटन ग्लोबल स्कूल-वसईचा श्रीशान पालवणकर, डॉ.अँटोनियो दासिल्व्हा हायस्कूल-दादरचा रुद्र भालेराव, एमपीएस-वरळीचा सिद्धांत मोरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय-वरळीचा समीर खान, पोद्दार अॅकॅडमी-मालाडचा प्रसन्ना गोळे आदी उदयोन्मुख सबज्युनियर कॅरमपटू पूर्ण तयारीनिशी स्पर्धेत उतरले आहेत. पंचाचे कामकाज नामवंत राष्ट्रीय दर्जाचे पंच प्रणेश पवार तसेच क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक, चंद्रकांत करंगुटकर पाहणार आहेत.

# शुबमनच्या आयपीएलमध्ये तीन हजार धावा पूर्ण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबादच्या घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात गुजरात टायटन्स संघाचा कर्णधार शुबमन गिलने शानदार ८९ धावांची खेळी केली. या खेळीसह गिलने तीन धावांचा टप्पा गाठला आणि भारताच्या इतर दिग्गज फलंदाजांना मागे टाकत एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

### दिग्गज फलंदाजांना टाकले मागे



आयपीएलमध्ये सर्वांत जलद तीन हजार धावा करणारा शुबमन गिल हा दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. गुजरात टायटन्सचा कर्णधार गिलने आयपीएलच्या ९२व्या डावांत ही कामगिरी केली. आयपीएलमध्ये सर्वांत जलद तीन हजार धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत केएल राहुल पहिल्या क्रमांकावर आहे. राहुलने अवघ्या ८० डावांत आयपीएलमधील ही कामगिरी केली होती.

शुबमन गिलने या यादीत विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना मागे टाकले आहे. विराटने आयपीएलमध्ये ११० डावांत तीन हजार धावा पूर्ण केल्या, तर रोहितने १०९ डावांमध्ये हा टप्पा पार केला. ११० डावांत ही कामगिरी करण्याचा विक्रमही गौतम गंभीरच्या नावावर आहे, तर सुरेश रैनाने १०३ डावांत आणि अजिंक्य रहाणेने १०४ डावांत आयपीएलमधील तीन हजार धावा पूर्ण केल्या आहेत.

# उबर चषक स्पर्धेतून पी.व्ही. सिंधूची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दोन ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू आणि दोन दुहेरी जोड्यांनी उबर चषक स्पर्धेतून माघार घेतली आहे, मात्र पुरुष गटात भारतीय संघ मजबूत दिसत आहे. थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन २७ एप्रिलपासून चेंगडू येथे होणार आहे.

फेब्रुवारीत आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपदाच्या माध्यमातून पुनरागमन करणाऱ्या सिंधूने आतापर्यंत सहा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला आहे. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी पुरेसा वेळ मिळावा याकरिता तिने माघार घेतली आहे. महिला दुहेरीत ट्रीसा जॉली व गायत्री गोपीचंद आणि अश्विनी पोनप्पा व तनीषा क्रॅस्टो यांनीदेखील माघार घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ऑलिम्पिक पात्रतेसाठी दुसऱ्या स्पर्धांवर लक्ष केंद्रित केले आहे.

# ओम् कबड्डी प्रबोधिनीचे पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

ओम् कबड्डी प्रबोधिनी प्रतिवर्षी आपल्या वर्धापन दिनानिमित्त ज्यांनी आपल्या देदीप्यमान खेळाने जिल्ह्याचे, संघाचे नाव उज्ज्वल केले अशा महान खेळाडूचा सन्मान पुरस्कार देऊन करीत असते. यंदा हा पुरस्कार महिलांमध्ये नवयुग क्रीडा मंडळ व बँक ऑफ महाराष्ट्र मुंबईची डावी मध्य रक्षिका स्मृती देव (सौ. अंजली अजित वैशंपायन) यांना, तर पुरुषांत वडेश्वर क्रीडा मंडळ व सेंट्रल बँक मुंबईचा अष्टपैलू खेळाडू चंद्रकांत पिरवरे यांना जाहीर करण्यात आला आहे.

प्रबोधिनीचा २१वा वर्धापन दिन मंगळवारी (दि. ९) रोजी सायंकाळी ७ वा. मुंबईतील दादर (प.) गोखले रोड येथील कित्ते भंडारी सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. या वेळी हॉकीतील आंतरराष्ट्रीय खेळाडू धनंजय महाडिक यांच्या उपस्थितीत पुरस्कार विजेत्यांना शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. त्याचबरोबर त्यांच्या खेळातील कौशल्याचा नवोदितांना परिचय करून दिला जाईल.

या ज्येष्ठ खेळाडूंना योग्य तो सन्मान करण्याकरिता कबड्डी परिवारातील सर्व लहान-थोर व्यक्तींनी सोहळ्यास उपस्थित राहून त्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन एका पत्रकाद्वारे प्रबोधिनीचे सचिव जीवन पैलकर यांनी केले आहे.

# पृथ्वी शॉबरोबरची 'ती' मिस्ट्री गर्ल कोण?



**मुंबई : प्रतिनिधी**

लोकप्रिय क्रिकेटपटू पृथ्वी शॉ दिल्ली कॅपिटल्सकडून यंदाची आयपीएल खेळत आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या टीमचा विमानतळावरील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, या व्हिडीओत त्याच्याबरोबर एक तरुणी दिसत आहे. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर ही तरुणी कोण? असा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे.

### सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल

'फिल्मीज्ञान' या पापाराझी अकाउंटवरून एक व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. हा व्हिडीओ विमानतळावरून बाहेर पडतानाचा आहे. यात दिल्ली कॅपिटल्सची संपूर्ण टीम आहे. त्याचबरोबर पृथ्वी शॉदेखील आहे. या वेळी पृथ्वीबरोबर असलेल्या तरुणीने लक्ष वेधून घेतले आहे. डेनिम शर्ट व जीन्स घातलेली एक तरुणी पृथ्वीबरोबर जाताना दिसत आहे. ही तरुण कोण, असे चाहते विचारत आहेत.

काही सोशल मीडिया युजर्सनी ही निधी तापडिया असल्याचे म्हटले आहे. निधी यापूर्वी बऱ्याचदा पृथ्वीबरोबर दिसली आहे. ती सीआयडी मालिकेत झळकली होती.

निधी तापडियाचे सोशल मीडियावर लाखो फॉलोअर्स आहेत. पृथ्वी शॉने त्रिशतक झळकावल्यावर तिने त्याच्यासाठी अनेक पोस्ट्सही केल्या होत्या. त्यानंतर बऱ्याचदा ते दोघे एकत्र दिसतात.

# पंजाबच्या विजयाचा शिल्पकार शशांक सिंह चर्चेत

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये शशांक सिंहने वादळी फलंदाजीच्या जोरावर आपल्या पंजाब किंग्ज संघाला गुजरात टायटन्सविरुद्ध ऐतिहासिक विजय मिळवून दिला. हा ३२ वर्षीय खेळाडू मुंबईकर आहे आणि मुंबई क्रिकेट संघाकडूनही क्रिकेट खेळला आहे.

शशांक सिंहचा जन्म छत्तीसगडमधील भिलाई येथे झाला. त्याचे वडील आयपीएस अधिकारी आहेत. नोकरीनिमित्ताने वडिलांच्या बदल्या होत असल्याने शशांकचे लहानपण वेगवेगळ्या ठिकाणी गेले. जबलपूरमध्ये शशांकच्या वडिलांची बदली झालेली असताना तो पहिल्यांदा अकादमीमध्ये जाऊन क्रिकेट खेळू लागला. शशांकला क्रिकेटपटू बनवायचे हे स्वप्न त्याच्या वडिलांचे होते. वयाच्या सहाव्या वर्षापासून शशांकचा क्रिकेट प्रवास सुरू झाला.



शशांक १७ वर्षांचा असताना मुंबईत आला. आझाद मैदानावरील सराव हा त्याचा दिनक्रम होता. शशांकने खूप मेहनत घेतली. २०१५मध्ये त्याला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईकडून खेळण्याची संधी मिळाली. फलंदाजीसोबतच ऑफ-स्पिन गोलंदाजी करणाऱ्या शशांकला चार हंगामात मुंबईसाठी १५ टी-२० आणि तीन लिस्ट ए सामने खेळण्याची संधी मिळाली.

मुंबई संघातून अधिक संधी न मिळाल्याने तो छत्तीसगढमध्ये गेला आणि त्या संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला. त्याने २०१८-१९ हंगामात पुद्दुचेरीसाठी एक लिस्ट ए सामनादेखील खेळला. छत्तीसगढ संघाकडून शशांक सिंहला अधिक संधी मिळू लागल्या. त्याला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पणाची संधीही मिळाली. २०२३मध्ये त्याने विजय हजारे ट्रॉफी सामन्यात १५०हून अधिक धावा केल्या आणि पाच विकेट्सही घेतल्या. ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय ठरला आहे.

आयपीएलमध्ये गुजरातविरुद्धच्या सामन्यात शशांक क्रीझवर आला तेव्हा पंजाबच्या विजयाची शक्यता पाच टक्क्यांहून कमी होती. २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघाने ७० धावांत चार विकेट्स गमावल्या होत्या. शशांकने २९ चेंडूंत नाबाद ६१ धावा करीत संघाला विजयाकडे नेले.

शशांकला सर्वप्रथम आयपीएलमध्ये दिल्ली संघाने खरेदी केले. त्यानंतर २०१९ ते २०२१पर्यंत राजस्थान रॉयल्स संघाचा तो भाग होता. दोन्ही संघांमधून त्याला खेळण्याची संधी मिळाली नाही. २०२२च्या आयपीएलमध्ये तो सनरायझर्स हैदराबादमध्ये होता.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com